मंगळवार, २५ जून २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 25 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-291 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# तिसऱ्या टर्ममध्ये पूर्वीपेक्षा तिप्पट मेहनत करू

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : आणीबाणीची आठवण, नवीन खासदारांना सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : आजचा दिवस गौरवाचा आहे, वैभवाचा दिवस आहे.**



**स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच आपल्या नव्या संसदेत हा शपथविधी सोहळा होत आहे. अनेकदा जुन्या संसदेत ही प्रक्रिया व्हायची. आजच्या महत्त्वाच्या दिवशी, मी सर्व नवनिर्वाचित खासदारांचे मनापासून स्वागत करतो, त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. संसदेची ही स्थापना भारताच्या सामान्य माणसाच्या पूर्ततेसाठी आहे, नवा उत्साह, नवीन गती आणि नवीन उंची गाठण्याची ही एक अत्यंत महत्त्वाची संधी आहे, हे 2047 च्या विकसित भारताचे ध्येय आहे. तुम्ही आम्हाला तिसऱ्यांदा सरकार चालवण्याचे आदेश दिलेत, आम्ही तिसऱ्या टर्ममध्ये पूर्वीपेक्षा तिप्पट मेहनत करू आणि तिप्पट निकालही देऊ. या संकल्पाने आम्ही नवीन कार्यभार घेऊन पुढे जाऊ, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले.**

18व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले असून अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली बाजू मांडली. ते म्हणाले की, आज 18व्या लोकसभेला सुरुवात होत आहे, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे की, जगातील सर्वांत मोठी निवडणूक अतिशय भव्य आणि गौरवशाली पद्धतीने संपन्न होत आहे. 65 कोटींहून अधिक मतदारांनी मतदानात भाग घेतला. ही निवडणूकसुद्धा खूप महत्वाची बनली आहे. कारण स्वातंत्र्यानंतर दुसऱ्यांदा देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा सरकारला सेवा करण्याची संधी दिली आहे. ही संधी 60 वर्षांनंतर आली आहे, ही एक अतिशय अभिमानाची घटना आहे. देशातील जनतेने हे सरकार तिसऱ्या टर्मसाठी पसंत केले, याचा अर्थ त्याचा हेतू मंजूर झाला आहे. त्यांची धोरणे मंजूर झाली आहेत, लोककल्याणासाठी त्यांचे समर्पण मंजूर झाले आहे. गेल्या 10 वर्षांत आम्ही देशाला पुढे नेण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. माझा विश्वास आहे की, सरकार चालवण्यासाठी बहुमत आहे आणि देश चालवण्यासाठी संमती आवश्यक आहे, त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन भारतमातेची सेवा करण्याचा आमचा प्रयत्न असेल. ते पुढे म्हणाले की, आम्हाला सर्वांना सोबत घेऊन चालायचे आहे आणि संविधानाचे पालन करत निर्णयांना गती द्यायची आहे. 18व्या लोकसभेत तरुण खासदारांची संख्या चांगली आहे. जेव्हा आपण 18 बद्दल बोलतो, तेव्हा ज्यांना भारताच्या सांस्कृतिक वारशाची माहिती आहे त्यांना माहित आहे की, 18 क्रमांकाचे येथे खूप सात्विक मूल्य आहे. गीतेचे 18 अध्याय असून या भागांमध्ये कृती, कर्तव्य आणि करुणा यांचा संदेश देण्यात आला आहे. येथे पुराण आणि उपपुराणांची संख्या देखील 18 आहे, 18 ची मूलांक संख्या 9 आहे आणि 9 पूर्णतेची हमी देते. आपल्याला वयाच्या १८ व्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळतो. 18 व्या लोकसभेची स्थापना हे देखील चांगले लक्षण आहे. पंतप्रधान म्हणाले की, देशाला सर्व खासदारांकडून खूप अपेक्षा आहेत. मी सर्व खासदारांना विनंती करेन की, या संधीचा उपयोग सार्वजनिक सेवेसाठी करावा आणि लोकहितासाठी शक्य ती पावले उचलावीत. यावेळी मोदींनी आणीबाणीची आठवण करून देत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

**भाजप खासदारांनी टाळ्या वाजवून मोदींचे केले अभिनंदन :** पंतप्रधान नरेंद्र मोदी, तालिकाध्यक्ष राधामोहन सिंह यांनी खासदार पदाची शपथ घेतली. नरेंद्र मोदी शपथ घेत असताना सभागृहात भाजप खासदारांनी टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले. महाष्ट्रातील पाच मंत्री नितीन गडकरी, पीयूष गोयल, प्रतापराव जाधव, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासह गोवाल पाडवी, शोभा बच्छाव, स्मिता वाघ, अनुप धोत्रे, बळवंत वानखेडे, अमर काळे, श्यामकुमार बर्वे, प्रशांत पडोळे, नामदेव किरसान, प्रतिभा धानोरकर, संजय देशमुख, नागेश आष्टीकर, वसंतराव चव्हाण, संजय जाधव हे खासदारांनी शपथ घेतली.

**पहिल्याच दिवशी वादाची ठिणगी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सरकारचा तिसरा कार्यकाळ सुरु झाला. मोदी 3 .0 सरकारचे पहिले अधिवेशन सोमवारपासून सुरु झाले. अधिवेनाच्या पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना सोबत घेऊन जनतेसाठी काम करण्याचा संकल्प केला. परंतु मोदी 3 .0 सरकारमध्ये मजबूत झालेल्या विरोधकांनी पहिल्याच दिवशी मोदी सरकारला झटका दिला. संसद अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात विरोधकांनी पहिला मोठा विरोध केला. हंगामी अध्यक्षाच्या पॅनेलवर विरोधकांनी बहिष्कार घातला. इंडिया आघाडीच्या तीनही सदस्यांनी हंगामी अध्यक्षाच्या (प्रोटेम स्पीकर) पॅनेलवर बहिष्कार टाकला. काँग्रेसचे के. सुरेश, टीएमसीचे सुदीप बंदोपाध्याय आणि डीएमकेचे टीआर बालू यांनी पॅनेलवर बहिष्कार टाकला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी के. सुरेश, सुदीप बंदोपाध्याय आणि टीआर बालू या तिघांनाही प्रोटेम स्पीकरच्या पॅनलमध्ये नियुक्त केले होते. परंतु या तिघांनी त्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. प्रोटेम स्पीकरच्या पॅनेलचे तीन सदस्य प्रोटेम स्पीकरला मदत करणार नाहीत. ते नवीन खासदारांना शपथ देणार नाहीत. हे पॅनल फक्त नवीन खासदारांना शपथविधी पुरता तयार केले आहे. लोकसभा अध्यक्ष निवडीनंतर पुन्हा नवीन पॅनल बनवले जाईल.

**इंडिया आघाडीच्या खासदारांच आंदोलन**

संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी हातात संविधान घेऊन इंडिया आघाडीच्या खासदारांनी आंदोलन केले. सोनिया गांधी यांच्यासह विरोधी पक्षातील खासदार या आंदोलनात सहभागी झाले होते.

# मराठा आंदोलकांनी डॉ.रमेश तारख यांना फासले काळे

## मनोज जरांगे यांच्या अंतरवाली सराटीमधील आंदोलनाला केला होता विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या चार साडेचार महिन्यांपासून मनोज जरांगे लढा देत आहेत. यासाठी त्यांनी तीनवेळा उपोषणही केले. मनोज जरांगे पाटील यांनी सगेसोयरे या अधिसुचनेची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. तर मनोज जरांगे यांच्या मागणीच्या विरोधात लक्ष्मण हाके यांनीही उपोषण करत आंदोलन सुरु केले होते. मात्र, राज्य सरकारच्या आश्वासनानंतर मनोज जरांगे आणि लक्ष्मण हाके यांनी उपोषण मागे घेतलेले आहे. सध्या दोघांनीही उपोषण मागे घेतले असले तरी आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. असे असतानाच मनोज जरांगे



पाटील यांच्या आंदोलनाला विरोध करणाऱ्या एका डॉक्टराला छत्रपती संभाजीनगरमध्ये काळे फासण्यात आल्याची घटना घडली आहे. मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटीमध्ये केलेल्या आंदोलनाला विरोध केल्याच्या कारणावरून डॉक्टराच्या तोंडाला काळं फासण्यात आले. डॉ.रमेश तारख यांनी मनोज जरांगे यांच्या अंतरवाली सराटीमधील आंदोलनाला विरोध केल्याचे मराठा आंदोलकांचे म्हणणे आहे.

मनोज जरांगे यांनी काही दिवसांपूर्वी अंतरवाली सराटीमध्ये आंदोलन केलं होतं. मात्र, या आंदोलनाच्या विरोधात डॉ.रमेश तारख यांनी प्रशासनाला अर्ज दिल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. डॉ.रमेश तारख यांनी आंदोलनाच्या विरोधात अर्ज दिल्याप्रकरणावरून काही मराठा आंदोलक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले आहे. डॉ.रमेश तारख यांना सोमवारी काही मराठा आंदोलकांनी भेटण्यासाठी बोलावले होते. त्यानंतर डॉ.रमेश तारख यांचा सत्कार केला. मात्र, त्यानंतर डॉ.रमेश तारख यांच्या तोंडाला काळे फासले. दरम्यान, यावरून छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठा आंदोलक पुन्हा एकदा आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा राजकारण तापण्याची शक्यता आहे. मला एकजणाचा फोन आला आणि सांगितले की, आम्हाला पेंशंट दाखवायचे आहे. त्यानंतर ते बाहेर येऊन थांबले. त्यानंतर काहीवेळाने ते आतमध्ये आले आणि त्यांनी माझा सत्कार केला. यावेळी मी त्यांना विचारले की सत्कार का केला. तर त्यांनी सांगितले की तुमचा वाढदिवस आहे. त्यानंतर मी त्यांना सांगितले की आज माझा वाढदिवस नाही. त्यानंतर त्यांनी मला काळें फासले, अशी प्रतिक्रिया डॉ.रमेश तारख यांनी दिली.

# अमरावती, यवतमाळ, वाशिमसह अकोल्यात जोरदार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रदेशिक हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना पावसाने अक्षरक्षः झोडपून काढले आहे. तर सोमवारी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केलेल्या बुलढाणा, अकोला, अमरावती, गडचिरोलीसह यवतमाळ, वाशिम येथे देखील मुसळधार पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. तर आजपासून पुढील पाच दिवस विदर्भातील सर्वच्या सर्व जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे बहूप्रतिक्षीत पावसाच्या सरी कोसळल्याने बळीराजासह सर्वसामान्य वैदर्भीय सुखावले आहे. तर पुढील काही दिवस विदर्भात पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज नागपूर प्रदेशिक हवामान विभागाने वर्तवविला आहे. सलग चौथ्या दिवशी वाशिम जिल्ह्यात अनेक भागात आज जोरदार पावसाने हजेरी लावलीय. वाशिम तालुक्यातील काकडदाती परिसरासह अनेक भागात मुसळधार पावसाने अक्षरक्षः झोडपून काढल्यानं शेतीत पेरलेल्या बियाण्यांसह खरडून गेलीय. या पावसाच्या पाण्यामुळे शेतीला काही काळ तलावाच स्वरूप आल होत. तर परिसरातील अनेक नाले ओसंडून वाहू लागले आहेत. नुकत्याच खरिपाची पेरणी केलेलं बियाणे पावसात वाहून गेल्यानं शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट आलंय. या सर्व नुकसानीचे पाहणी आणि पंचनामे करून योग्य ती मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. यवतमाळच्या नेर तालुक्यातील धनज-माणिकवाडा या ठिकाणी आज दुपारच्या सुमारास जवळपास 1 तास मुसळधार पावसाने हजेरी लावली. यावेळी फकिरजी महाराज मंदिर जवळून गेलेल्या नाल्याला चांगलाच पूर आला. तसेच नदी-नाल्या काठावरील शेतजमीनीचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी आता शेतकरी आणि स्थानिकांकडून केल्या जात आहे.

मागील दोन दिवसांपासून पावसाने उसंत घेतल्यानं वातावरणात प्रचंड उकडा निर्माण झाला होता.

# ७४ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पारनेरच्या भूमिपुत्राचे संसदेत पाऊल !

## खा. नीलेश लंके आज घेणार शपथ : संसदेच्या अधिवेशनासाठी संसद भवनात दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** तब्बल ७४ वर्षांच्या बहुप्रतिक्षेनंतर खासदार नीलेश लंके यांच्या रूपाने पारनेरच्या भूमिपुत्राने सोमवारी, २४ जुन रोजी संसदेत पाहिले पाऊल टाकले. संसदेत पारनेरला कधी प्रतिनिधीत्व मिळणार ? या प्रश्नाचे उत्तर खा. नीलेश लंके यांनी इतिहास घडवत दिले असून मंगळवारी संसदेमध्ये शपथ घेण्यासाठी लंके यांचा २९८ हा क्रमांक निश्चित करण्यात आला आहे. सन १९५१ मध्ये पहिली लोकसभा अस्तित्वात आली. त्यानंतर पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणूकांमध्ये स्व. कॉ. बाबासाहेब ठुबे यांनी कम्युनिष्ट पक्षाच्या वतीने तर स्व. सॉ. गुलाबराव शेळके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविली. मात्र दोन्ही निवडणूकांमध्ये पारनेरच्या या भूमिपुत्रांना यश आले नाही. काँ. बाबासाहेब ठुबे यांनी कोपरगांव लोकसभा मतदारसंघातून कम्युनिष्ट पक्षाच्या वतीने निवडणूक लढविताना स्व. बाळासाहेब विखे यांनी त्यांना मदतीचा शब्द दिला होता. प्रत्यक्षात मात्र विखे यांची फौज भाजपाचे उमेदवार वसंतराव गुंजाळ यांच्या पाठीशी गेल्याचा आरोप कम्युनिष्ट कार्यकर्ते आजही करत आहेत. अर्थात त्या निवडणूकीत स्व. बाबासाहेब ठुबे यांचा मोठा पराभव झाला असला तरी भाजपाचे उमेदवार वसंतराव गुंजाळ यांनाही यश मिळू शकले नव्हते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या एकत्रीत निवडणूकीसाठी शरद पवार यांच्या आग्रहाखातर स्व. सॉ. गुलाबराव शेळके यांनी निवडणूक लढविली. विधानसभेला तत्कालीन आमदार वसंतराव झावरे हे रिंगणात होते. लोकसभेसाठी काँग्रेसचे उमेदवार गोविंदराव आदिक तर विधानसभेसाठी स्व. ज्ञानदेव पठारे हे होते. त्यावेळी स्व. बाळासाहेब विखे यांनी शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढवून ती जिंकली. शिवसेनेचे सबाजीराव गायकवाड हे विधानसभेचे उमेदवार म्हणून त्यांच्यासोबत होते, तर मा. आ. नंदकुमार झावरे हे अपक्ष म्हणून रिंगणात होते. या निवडणूकीत लोकसभेमध्ये स्व. गुलाबराव शेळके यांच्यासह गोविंदराव आदिक हे पराभूत झाले. विधानसभेला वसंतराव झावरे यांनी विजय संपादन केला. सबाजीराव गायकवाड व नंदकुमार झावरे हे पराभूत झाले होते.




**स्व. शेळके यांना ऐनवेळी उमेदवारी**

स्व. बाबासाहेब ठुबे यांच्यापेक्षा स्व. गुलाबराव शेळके हे लोकसभा निवडणूकीत विजयी होतील अशी पारनेरकरांना अपेक्षा होती. परंतू पारनेरकरांकडूनही त्यांना फारशी साथ लाभली नाही. इतर तालुक्यांमध्येही स्व. शेळके हे अपेक्षित मते घेऊ शकले नाहीत. अर्थात स्व. शेळके यांना ऐनवेळी निवडणूकीच्या रिंगणात उतरविण्यात आल्याने पक्षाच्या यंत्रणेवरच त्यांना विसंबून रहावे लागले. दुसरीकडे विखे यांची यंत्रणा सक्षम असल्याने त्यांनी या निवडणूकीत सहज विजय संपादन केला.

**लंके यांच्याकडून खासदारपदाचे गिफ्ट**

सन २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत नीलेश लंके हे उमेदवार असणार याची कुणकूण सुमारे अडिच तिन वर्षांपूर्वीच लागली होती. शरद पवार यांनी लंके यांनी ही निवडणूक लढवावी असा शब्द टाकला होता. पवारांचा शब्द प्रमाण माणून लंके यांनी संपूर्ण मतदारसंघात संपर्क वाढविला होता. त्याचाच फायदा त्यांना झाला. त्यांनी डॉ. सुजय विखे यांच्यासारख्या बलाढय उमेदवाराचा पराभव करत पारनेरकरांना खासदारपदाचे गिफ्ट दिले. अर्थात पारनेरकरांनीही लंके यांना सर्वाधिक मताधिक्य देत आपली भूमिका चोखपणे निभावली.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


आपलं आरोग्य चांगलं राहण्यासाठी ही सप्तपदी जर प्रत्येकाने अवलंबली तर बरेचसे आजार आटोक्यात राहून निरामय जीवन जगता येईल. त्यातील पहिलं पाऊल म्हणजे सकस आणि ताजा आहार, दुसरं पाऊल म्हणजे पुरेशा प्रमाणात घेतलेली झोप अत्यंत महत्वाची आहे. कारण ती आपल्या शरीर आणि मनाला ताजतवानं ठेवते. तिसरं पाऊल म्हणजे व्यायाम मग त्यात योग , प्राणायाम, एरोबिक्स, सूर्यनमस्कार, प्राणायाम, सकाळी किंवा संध्याकाळी फिरणं हे आपल्या सोयीनुसार आणि क्षमतेनुसार करावं. जास्त काही करायला नाही जमलं तरी रोज नियमित बारा सूर्यनमस्कार जरी आपण घातले तरी त्यामुळे चांगल्या आरोग्याचा लाभ होईल. सूर्य हा शक्तिदाता, चैतन्यदाता आहे. ऊर्जा प्रदान करणारा आहे. त्याला आपल्या आरोग्यासाठी प्रार्थना करावी. रोज थोडा वेळ तरी कोवळ्या उन्हात फिरावं. चौथं पाऊल मनाला ताजतवानं ठेवण्यासाठी संगीत ऐकणं, एखादा छंद जोपासणं, चांगल्या पुस्तकांचं वाचन या गोष्टी आपल्याला मनाची आणि विचारांची समृद्धीही देतील. त्यासोबतच मित्र जोडणे, लहान मुलांमध्ये वेळ घालवणे, मुलात मूल होऊन खेळणे या गोष्टी पण आपल्याला वाढत्या वयाची जाणीव होऊ देणार नाहीत.




## हितगुज



पुष्प
९८वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### अध्यात्म व व्यक्तीमत्त्व

हल्ली आपल्याला शाळा, संस्था, घरे, माध्यमे सर्वत्र परवलीचा एक शब्द ऐकू येतो सतत, केव्हाही आणि तो शब्द आहे.'व्यक्तीमत्त्व विकास' सुस्थितीतला सुशिक्षित पालक वर्ग पाल्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी, बालकाच्या जन्मापासून ध्यास घेऊन धडपड करीत असतो. मुळात व्यक्तीमत्त्व म्हणजे अस्तित्त्वाला शोभणारा डौलदार गुणात्मक, ज्ञानात्मक, संवेदनशील आकार होय. हा आकार सर्वांना जन्मतः मिळालेला असतो. परंतु लाभलेले व्यक्तीमत्त्व चैतन्यपूर्ण, प्राणवान, उत्तम बनवणे, याकरिता विशिष्ट ध्येये, दिशा, धडाडी, मार्गदर्शन व परिश्रम यांची गरज असते. ही गरज सामाजिक, कौटुंबिक वातावरणातून, संस्कार व शिक्षणातून, कर्तव्ये व जाणीवांतून पूर्ण केली जाते. एखादे शिल्प अत्यंत सुंदर, कलात्मक घडवले, पण जोवर त्याची प्राणप्रतिष्ठा होत नाही, तसेच जोवर ते श्रद्धेने पूजले जात नाही तोवर त्याला देवत्व मिळत नाही म्हणून व्यक्तीमत्त्व विकास म्हणजे दर्शनीय रूपडे नाही किंवा काही कौशल्यांना मिळालेली झळाळी नाही. व्यक्तीमत्त्व विकास म्हणजे अंतरंगी सतत तेवणारे दिव्य स्फुरण, त्यातून घेतलेली उत्तुंग भरारी, त्या भरारीसाठी आत्मविश्वासाच्या पंखांना मिळालेले श्रद्धेचे बळ, निळ्या आकाशाच्या अथांगतेचा घेतलेला वेध, ज्योतिर्मान होण्याची प्रबळ आकांक्षा, स्वतःची शुद्ध ओळख, विवेकाची सोबत, उत्तम घडवण्याची जिद्द, निराशेवर मात करणारे धैर्य, परिश्रमाची कास, सर्वांबद्दलची आपुलकी, आदर, ओठावर खेळणारे हसू, चेहऱ्यावर सतत चमकणारा सात्त्विक आनंद, निर्भयता इत्यादींचा समन्वित सुंदर प्रभाव व छा म्हणजे व्यक्तीमत्त्व विकास. हा विकास मनाच्या विशालतेने व बुद्धीच्या सखोलतेने घडून येतो. अध्यात्म या दोन्ही गरजा व्यवस्थित पूर्ण करते. अध्यात्म भौतिकतेचा स्थूल हव्यास कमी करत करत अंतर्मनाची सूक्ष्मता वाढवत जाते. ही सूक्ष्मता जसजशी वाढते तसे भ्रम, अहंकार ग पडतात, वृक्षवल्ली, वनचरें सोयरे बनतात, पक्ष्यांची भाषा उमजते, अनाहताचा ध्वनी ऐकू येतो, परम ज्ञानाची भूक वाढते, दुःखे निपटून काढण्याची तगमग वाढते, मग राजपुत्र सर्व वैभव, सत्ता त्यागून घराबाहेर पडतो. महान तपश्चर्येने तो भगवान तथागत होतो. महान व्यक्तीमत्त्व अशा अध्यात्माच्या तप्त वाटेवरून सोन्यासारखे उजळत जाते आणि इतरांनाही उजळवते.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

गोरक्षनाथांनी तीला उशीर होण्याचे कारणं विचारले. सिद्धीने झालेला सर्व प्रकार कथन केला. आपल्या सिद्धीला कोणी गोसाव्याने दंड



मारून पाडले हे एकून गोरक्षनाथांचा क्रोध अनावर झाला. आपल्या योगसामर्थ्याचा अपमान करणाऱ्याला शासन करायला ते त्या पर्वतावर पोहोचले. गोरक्षनाथांचा क्रोध म्हणजे ज्वालामुखीच. पर्वतावर दत्तात्रय ध्यानस्थ बसले होते. गोरक्षनाथांनी क्रोधायमान होऊन दातात्रेयांवर झेप घेतली. पण अघटीत घडले. गोरक्ष दत्तात्रेयांच्या शरीरातून त्यांना काहीही इजा न करता आरपार निघून गेले. पाण्यातून काठी फिरवली तरी ते जसे अभेद रहाते अगदी तसे. गोरक्ष विस्मयचकीत झाले. दत्तात्रेयांनाही गोरक्षांची परीक्षा पहावी असे वाटले. ते गोरक्षनाथांना म्हणाले, "गोरक्षा! तुझ्या सिद्धींविषयी मी बरेच ऐकून आहे. तु सिद्धांचा सिद्ध आहेस असे ऐकले आहे. तुला ब्रह्मांडसमाधीचा अनुभव आहे म्हणे. जरा पंचतत्वात लीन होवून दाखव बरे. बघूया तुला शोधता येतय का ते. गोरक्षनाथ अवश्य म्हणत तेथून गुप्त झाले आणि समुद्रात एक छोटा मासा बनले. दत्तात्रेयांनी ध्यान लावले आणि क्षणात गोरक्षांचा ठाव शोधला. पटकन पाण्यात हात घालून त्यांनी माशाच्या रूपातील गोरक्षनाथांना बाहेर काढले. मग ते गोरक्षनाथांना म्हणाले, "आता मी अदृश्य होतो. तू जर मला शोधू शकलास तर तू खरा सिद्ध. मग माझे सर्वस्व तुला दिले असे समज." गोरक्षाने होकार देताच दत्तात्रेय अदृश्य पावले. गोरक्षाने चौदा भुवने, तीर्थक्षेत्रे, गुहा, वने, समुद्र सर्व शोधले पण दत्तात्रेय काही त्यांना सापडले नाहीत. आपण हरलो असे लक्षात येऊन गोरक्षांनी मच्छिंद्रनाथांचा धावा केला. मच्छिंद्रनाथ तात्काळ पर्वतावर प्रकट झाले. गोरक्षांनी झालेली हकीकत सांगितली. ती एकल्यावर मच्छिंद्र म्हणाले, "गोरक्षा! हा नक्कीच अत्रेय आहे. त्यांच्याशिवाय अन्य कोणालाही असला अचाट प्रकार करता येणार नाही. त्याला शोधण्याचा मार्ग एकच की तू लीन भावाने पंचतत्वात विलीन झालेल्या दत्तात्रेयांना मनोध्यानाने शोध." गुरू आज्ञेनुसार गोरक्षांनी तसे करताच दत्तात्रेयांचे दिव्य स्वरूप त्यांना दृगोचर झाले. "अलक्ष" शब्द गर्जून गोरक्ष त्यांना "आदेश" करते झाले आणि म्हणाले, अलक्ष दत्तात्रेय अवधूत । तू निरालंब मायातीत॥

अध ऊर्ध्व अजपा जपत । अलक्षलक्षी जागसी॥
अलक्षचिन्नभी चिदद्वयचंद्र। तो अमृत स्त्रवे निरंतर॥
कोटी विद्युल्लता चंद्र भास्कर। अलक्षलक्षी जागसी॥
अलक्ष इडा पिंगला शुषुम्ना। मनोन्मन ध्यानधारणा॥
सहजसमाधी मनोपवना । अलक्षलक्षी जागृत॥
अलक्ष शुन्यभूवन श्रुत। ते सहस्त्रदळहारीनिवांत॥
भ्रमरगुहा गुंजारवीत। अलक्षलक्षी जागसी॥
अलक्ष मी आदिनाथ पौत्र। मच्छेंद्रगुरूचा वरदपुत्र॥
तत्प्रसादे निगममंत्र। अलक्षलक्षी जागृत॥
अलक्ष चित्तचैतन्यचिद्रस। तेथे संलग्न समरस॥



आधुनिक केसरी

### एकरूप झाला | तुझ्या पायी ||

स्मरता पंढरी | ओढ लागे मना ||
पंढरीचा राणा | दिसु लागे ||१||
माहेराची ओढ | वेड लावी जीवा ||
विठ्ठल केशवा | मायबापा ||२||
व्याकुळले आता | काया वाचा मन ||
सांजवला प्राण | तळमळे ||३||
न दिसे आणिक | गणगोत दुजे ||
अनाथांचे ओझे | तुच वाही ||४||
माझा तुझा भाव | आता न उरला ||
एकरूप झाला | तुझ्या पायी ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अनुभव गति का पन्थ है,
बूझत बूझत बूझ ।
साहेब अनुभवगम्य है, सूझत सूझत सूझ
।।३२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल द्वितीय अध्याय) ०४/०२/३२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम मार्ग हा चेतन मार्ग आहे. क्रमशः अंतरात सूक्ष्म होत-होत हा मार्ग प्रत्यक्ष होत जातो तसाच परमेश्वरही अनुभवगम्य आहे. जड दृष्टीपलीकडे सूक्ष्म अंतरचेतन दृष्टीने त्या परब्रह्माचा साक्षात्कार, अनुभव होतो. चेतनास चेतनच पाहतो, म्हणून विहंगम मार्ग हा सूक्ष्म आत्म्याचा चेतन-पथ आहे, ज्याच्या द्वारे आत्मा प्रकृती-संघातला सोडून चिन्मय स्वरूपाने परब्रह्मास प्रत्यक्ष करतो.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ज्ञान हे दुहेरी शस्त्र आहे

आधुनिक केसरी

लोककल्याणाच्या तळमळीने जो ग्रंथ लिहितो तो खरा ग्रंथकार होय; वाचनात आलेले आचरणात आणून जो लोकांना सांगतो तो खरा वक्ता होय; आणि सांगितलेले जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता आणि साधक होय. अलीकडे ज्ञानप्रसाराची अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे नको त्या ज्ञानाचाही विस्तार झपाट्याने होतो आहे. ज्ञान हे एक प्रकारचे दुहेरी शस्त्र आहे. कोणत्याही ज्ञानाचा बरावाईट उपयोग, तो करणाऱ्यावर अवलंबून असतो. ज्ञान हे मुळात पवित्र आहे. जे ज्ञान नीती आणि धर्म यांच्या पायावर उभे असते ते जास्त प्रभावी ठरते. सर्वांचे एकमेकांवर प्रेम वाढेल आणि सर्वजण एकत्र येतील असे ज्ञान असावे. श्रीमंत-गरीब, विद्वान्-अशिक्षित, लहान-थोर, स्त्री-पुरुष या सर्वांना एकमेकांबद्दल प्रेम, आदर आणि आपुलकी वाढेल, असे ज्ञान व्यक्त झाले पाहिजे. द्वेष-मत्सर वाढवील, नीतिधर्माला फाटा देईल, असे ज्ञान पुस्तकात नसावे. विद्वान् शास्त्रज्ञ नवीन शोध लावून जगाला स्वार्थी आणि लोभी बनवितात, आणि त्यामुळे सर्वनाश



होतो. जे ज्ञान समाधान देत नाही ते खरे ज्ञान नव्हे. जगाचे खरे स्वरूप ज्याने कळते ते खरे ज्ञान होय. देहासंबंधी जे ज्ञान ते व्यावहारिक ज्ञान; जे जसे आहे तसे ओळखणे हे तत्त्वज्ञान. मी देहाला ‘ माझा’ म्हणतो, अर्थात मी देह नव्हे. ‘ माझे घर ’ म्हणणारा ‘ मी ’, घराहून वेगळा ठरतो ! जडत्व म्हणजे काय ? देहाच्या ठिकाणी ममत्व हे जडत्व. पदार्थाचे यथार्थ ज्ञान ज्याला आहे तो शहाणा. व्यवहाराचे गूढ ज्याला कळते तो प्रपंची; जगाचे गूढ ज्याला कळते तो तत्त्वज्ञानी. सूक्ष्माचे ज्ञान होणे यात सुख आहे. आत्मा हा समुद्र आहे, तर जीव हा त्याचा अगदी लहान थेंब आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे हेच खरे तत्त्वज्ञान आहे. ‘ ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या ’ अशा ज्ञानाच्या गोष्टी कळायला कठीण असल्या, तरी अभ्यासाने दीर्घ काळानंतर कळतील; पण नामाचे महत्त्व कळणार नाही; ते एक संतकृपेनेच कळते. नामावर विश्वास बसणे महाभाग्याचे लक्षण आहे. आपण बुद्धिभेदापासून सावध, दूर राहिले पाहिजे. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे; त्यानेच समाधान लाभेल. ज्या ग्रंथांच्या श्रवणाने भगवंताविषयी प्रेम उत्पन्न होते, ज्याच्या योगाने विरक्ती उत्पन्न होते, अनीतीचे वर्तन टाकून नीतिमार्ग, धर्ममार्ग, याचा अवलंब करावासा वाटतो, ते सद्ग्रंथ; उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी, दासबोध, नाथभागवत. हे ग्रंथ सदोदित वाचून त्यांचे मनन करणे, हेच फार जरुरीचे आहे; त्याने ईश्वरप्रेम उत्पन्न होते. **१७६. अत्यंत कठीण प्रमेये असलेले जगातले ग्रंथ वाचावेत, पण शेवटी अत्यंत सोप्यातले सोपे असे नामच घ्यावे.**

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

ईश्वराने विश्व निर्माण करण्याचा निर्णय घेतला किंवा ठरवले की पृथ्वीवर जीव निर्माण करायचा. पण तो कसा करायचा त्यासाठी हवा,



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अन्न, पाणी यांची गरज आहे. बरं ते सर्व निर्माण केलं आता बीजरुप असल्या शिवाय उत्पत्ती नाही. बरं नुसती उत्पती नको तर स्थिती हवी व नंतर लय हवे ही क्रमाक्रमाने घडणारी घटना आहे म्हणून तर सर्व दृष्य घटनांचे मूळ कारण बीजरूप आहे मित्रांनो. म्हणून तर म्हणतात शुध्द बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ब्रम्हांडा मध्ये असणारी जाणीव कारण रूप आहे. पिंडामध्ये ती कार्य रूपाने वावरते. ती समजण्यासाठी आपल्याला वेळ लागतो खरा. कारण अतिशय गुण चिद्दिनरंतर अशी ही विश्व संकल्पना आहे. माझ्या सारख्या लोकांना समजण्यासाठी किती तरी जन्म घ्यावे लागतील. किती जन्मानंतर ईश्वर संकल्पना समजेल हे अज्ञात आहे. पण मला जो हा मानवी जन्म मिळाला आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २५ जून २०२४
adhunikkesari.com

# पंकजाताई मुंडेंविषयी आक्षेपार्ह पोस्ट

## जिंतूरमध्ये कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांच्याविषयी समाज माध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट टाकण्यात आली आहे. हि पोस्ट टाकणाऱ्या एकावर जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. तसेच याच्या निषेधार्थ आज जिंतूरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात येत आहे.

भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांच्याविषयी सोशल मीडियावर अभि तळेकर पाटील या इन्स्टाग्रामवर आयडीवरून अश्लील शब्दात पोस्ट टाकण्यात आल्याचे रविवारी रात्री निदर्शनास आले.

या पोस्टमुळे सकल ओबीसी समाज बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. दरम्यान या घटनेमुळे तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधव संताप व्यक्त करत रात्री जिंतूर पोलीस ठाण्यात जमा झाले होते. यानंतर सर्व ओबीसी बांधवांनी एकत्र येत सकल ओ बी सी समाजातर्फे जिंतूर पोलीस व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. व सदर च्या इसमास व त्याच्या सहकार्यास तालुक्यातून हद्दपार करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. सदर इन्स्टाग्राम आयडी असणाऱ्या इसमावर जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याचबरोबर सकल ओबीसी समाज बांधवांच्यावतीने आज जिंतूर बंदची हाक दिली आहे. त्यानुसार जिंतूरमध्ये सकाळपासून कडकडीत बंद पाळण्यात येत आहे. व्यापाऱ्यांनी देखील दुकाने बंद ठेवली आहे. दरम्यान ओबीसी समाज बांधव रस्त्यावर उतरल्याचे देखील पाहण्यास मिळाले. सदरच्या निवेदनावर नानासाहेब राऊत, प्रल्हादराव बुधवंत, लक्ष्मण बुधवंत, गजानन गडदे आदी अनेकांच्या सह्या आहेत.



# वडेट्टीवारांची तत्काळ हकालपट्टी करा

## मराठा महासंघ आक्रमक


आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने काँग्रेसला मदत केली. आमच्या मतांवर यांचे अनेक खासदार निवडून आले. परंतु, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना केवळ ओबीसी समाजाचीच काळजी आहे असे दिसून येते. मराठा आरक्षणसाठी आतापर्यंत २०० युवकांनी आत्महत्या केल्या. परंतु, त्यांच्या सहानुभूतीसाठी वडेट्टीवारांनी कधी शब्दही काढला नाही. किंवा त्यांच्या परिवाराची भेट घेतली नाही. उलट ओबीसी उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांच्या उपोषणस्थळी भेट देत अश्रू काढून मराठा विरोधी चिथापनी देत आहेत. विरोधी पक्षनेते हे कुठल्या एका पक्षाचे नसतात. त्यामुळे अशा जातीयवादी विरोधी पक्षनेत्याची काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाने केली. अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी नागपूर येथे पार पडली. यावेळी विविध ठराव घेण्यात आले. त्याची माहिती राष्ट्रीय सरचिटणीस संभाजीराजे दहातोंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. आरक्षणाच्या विषयावर मराठा व ओबीसी असा विनाकारण वाद निर्माण करून फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील वातावरण दूषित केले जात आहे. त्यामुळे राज्याच्या पावसाठी अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहात आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा ठराव घेऊन तो केंद्र सरकारकडे पाठवावा. तसेच राज्यातील ४८ खासदारांनी संसदेमध्ये यावर चर्चा घडवून आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी लावून धरावी, असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाने केले. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. मात्र, त्यांची 'सगेसोयरे'ची मागणी पूर्ण होणे शक्य वाटत नाही. तसेच राज्य शासनाने सध्या दिलेले १० टक्के आरक्षणही न्यायालयात टीकण्याची शक्यता कमी आहे.

# भुजबळांचा मनोज जरांगे पाटलांवर पलटवार

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** तुझे किती 56 टक्के असू दे किंवा 100 टक्के असू दे. आम्हाला काही फरक पडत नाही. आम्ही कुठे सांगितले तलवारी काढा? प्रश्न विचारायला शिका, जागृत व्हायला शिका, असे सांगण्यासाठी उदाहरणे दिली जातात. तुझ्याकडे तर पिस्तुलधारी आहेत.



वाळू माफिया, अजून काय काय माफिया तुझ्यासोबत आहेत. तुझ्या आजूबाजूचे कार्यकर्ते शोधले तर अनेक जण सापडतील, असा पलटवार भुजबळांनी केला आहे. ओबीसींच्या आंदोलनावेळी छगन भुजबळांनी चिथावणीखोर भाषण केली. तलवारी गंजल्या आहेत, घासून ठेवा. त्याला दंगल घडवायची आहे. आमचे 56 टक्के मराठे आहेत, असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केले होते. यावरून राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला. 'चला उठा आयुष्याच्या मशाली पेटवा असे उदाहरण दिले, म्हणजे कायम मशाली पेटवून ठेवायच्या का? त्यांनी आता शाळेत जायला पाहिजे, असा टोला भुजबळांनी लगावला आहे.

यावेळी भुजबळ म्हणाले की, आम्ही आयडॉलॉजीमधून लढतो. भाषणातून अनेक उदाहरणे, उपमा देत आम्ही लढतो आहे. चला उठा आयुष्याच्या मशाली पेटवा असे उदाहरण दिले, म्हणजे कायम मशाली पेटवून ठेवायच्या का? त्यांनी आता शाळेत जायला पाहिजे. त्याला काय समजत नसेल, पण त्याने शाळेत जावे. तिथे समजेल की नाही हे देखील महत्वाचे आहे. पण त्यांना शाळेत जाण्याची गरज आहे. आपण भाषण करतो तेव्हा, अशा उपमा दिल्या जातात. त्याला समजणे शक्य नाही. त्यासाठी थोडे शिक्षण महत्वाचे असते.

लोकांना जागृत करण्यासाठी तसे बोलावे लागते. लेकरं बाळं, लेकरं बाळं म्हणून भावनिक करायचे. त्याच्या पलीकडे त्याला काही जमत नाही. आमच्याकडेही लेकरं बाळ आहेत. अन्याय कोणत्याही समाजावर होत असेल तर सर्वांनी एकत्र जावून त्याच रक्षण केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांची ती शिकवण आहे. आम्ही शेरो शायरीतून, अभंगातून तशी उदाहरणे देत असतो. नाठाळाच्या माथी हाणू काठी, असा अभंग आहे. म्हणून आपण डोक्यात काठी मारत फिरतो का? पण हे समजायला थोडे तरी शिक्षण लागते, असा टोला छगन भुजबळांनी मनोज जरांगेंना लगावला.



# केजरीवालांना दिलासा नाहीच

आधुनिक केसरी

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावरील स्थगिती हटवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. यासंदर्भात जोपर्यंत दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत अरविंद केजरीवाल यांना जामीन देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. याप्रकरणाची पुढील सुनावणी बुधवारी २६ जून रोजी होणार आहे. त्यामुळे अरविंद केजरीवालांचा तुरुंगातील मुक्काम वाढला आहे. दिल्लीतील कथित मद्यधोरण घोटाळ्याप्रकरणी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे सध्या तुरुंगात असून त्यांना शुक्रवारी दिल्लीतील राउज एवेन्यू न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. मात्र, या निर्णयाविरोधात ईडीने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांच्या जामिनाला स्थगिती दिली. या निर्णयाविरोधात अरविंद केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. अरविंद केजरीवाल यांच्या याचिकेवर आज न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि एस.वी. भट्टी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांच्या जामिनावरील स्थगिती हटवण्यास नकार दिला. जोपर्यंत दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत अरविंद केजरीवाल यांना जामीन देता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. या सुनावणीदरम्यान अभिषेक मनुसिंघवी यांनी अरविंद केजरीवाल यांची बाजू मांडली. यावेळी त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला विरोध करत हा निर्णय रद्द करावा, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली. अरविंद केजरीवाल यांचा जामिनाला स्थगिती देताना दिल्ली उच्च न्यायालयाने कोणतेही कारण दिले नाही, असे अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला सांगितले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आधी उच्च न्यायालयाच्या निर्णय येऊ द्या, त्यानंतर याप्रकरणी सुनावणी घेता येईल, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच याप्रकरणाची पुढील सुनावणी २६ जून रोजी होईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. दिल्लीतील मद्य विक्री घोटाळ्याप्रकरणी ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना अटक केली होती. त्यानंतर १० मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम जामीन दिला. त्यानंतर त्यांनी पुन्हा २ जून रोजी तुरुंगात आत्मसमर्पन केले होते. त्यानंतर ५ जून रोजी वैद्यकीय कारणासाठी जामीन अर्ज न्यायालयात दाखल केला होता. मात्र, अंतरिम जामीन देण्यास सत्र न्यायालयाने नकार दिला होता. तसेच विशेष न्यायालयात नियमित जामिनासाठी त्यांची याचिका प्रलंबित होती. त्यावर विशेष न्यायालयाने केजरीवाल यांची न्यायालयीन कोठडी वाढविली होती. तसेच जामीन अर्जावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. याचा निकाल २१ जून रोजी देत न्यायालयाने जामीन मंजूर केला होता.

# २६ स्वयंसेवकांचे बलिदान



अशोक राणे, अकोला
संपर्क क्र. 9423658385

आधुनिक केसरी

**हिंदू विचाराला केंद्रबिंदू मानून राष्ट्रीय स्वंसेवक संघाची स्थापना१९२५साली विजयादशमीच्या दिवशी डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी केली आहे आज हिंदूची विशाल संघटना असलेल्या संघाने ९९ वर्षाचा खडतर प्रवास व संघर्ष करीत शताब्दी महोत्सवा कडे यशस्वी वाटचाल करीत आहे संघाच्या स्वयंसेवकानी संघ स्थापने पासून हिंदू समाजात सामाजिक समरसता व सामाजिक सौहार्द निर्माण करण्यावर भर देऊन तथा राष्ट्र सर्वोपरीचा विचार रुजविलेला आहे देशात जेव्हा जेव्हा काही समस्या निर्माण झाल्या तेव्हा संघ स्वंयसेवकांनी सामाजिक सलोखा दुषित होणार नाही याची काळजी घेतली आहे.**




प्रसंगी बलिदान बलिदान सुध्दा पत्करले आहे पंजाब मध्ये दहशतवाद बोकाळला होता हिंदू-शिखा मध्ये उभी फूट पाडून खलिस्तान चळवळ उभी करण्यात आली होती तेव्हा संघाच्या २६ स्वयंसेवकांनी मोगा येथे बलिदान देऊन पंजाबमध्ये सामाजिक समरसता, सामाजिक सलोखा,देशाची एकात्मतेचा भाव कायम केला होता खलिस्तान चळवळीच्या काळात स्वयंसेवकांचे बलिदान मोगा हत्याकांड म्हणून ओळखले जाते जेथे आतंकवादी हल्ला झाला होता त्या कार्यक्षेत्राचे प्रचारक नागपूरचे अजय नीलदावार होते. देशाच्या विविध भागात समाजात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण करण्यात संघ स्वयंसेवकांची महत्वाची भूमिका आहे राहीलेली असून पंजाब मधील मोगा येथील २६ स्वयंसेवकांचे बलिदानाची घटना त्याचेच द्योतक आहे ऐंशी च्या दशकात पंजाब मध्ये सीमा पलीकडून पाक पुरस्कृत खलिस्तान चळवळ मोठ्या प्रमाणात बोकालळी होती स्वतंत्र खलिस्तान मागणी सह हिंदू-शिख उभी फूट पाडून देश तोडण्याचे प्रयोग करण्यात आले होते संघाच्या कार्यकर्त्यांना लक्ष करण्यात येत होते"ऑपरेशन ब्लू स्टार" श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या नंतर शिखांचे झालेल शिरकाण यामुळे शिख समुदाय व्याथित झाला संघाचे स्वयंसेवक शिखांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते पण पंजाबची परीस्थिती बिकट झाली होती तेव्हा संघ वरिष्ठ नेतृत्वाने देशातील स्वयंसेवकांना पंजाबमध्ये प्रचारक म्हणून काम करण्याचे आवाहन करून श्री सुदर्शनजी यांचे पंजाबचे दायित्व देण्यात आले होते त्या नुसार नागपूरचे अजय नीलदावार पंजाब मध्ये गेले त्यांच्याकडे मोगा कार्यक्षेत्र असलेल्या फीरोजपुरचे जिल्हा प्रचारक दायित्व देण्यात आले होते मोगा शहर पाकिस्तान सीमालगत असलेल्या फिरोजपुर जिल्हा होते तेथील परिस्थिती बिकट होतीसंघ कार्यकर्त्यांनी आतंकवाद्यांना न घाबरता आपले कार्य करीत त्यांचे मनसुबे धुळीस मिळविले त्यामुळे चवताळलेल्या आतंकवाद्यांनी प्रभात



शाखेवरच हल्ला करण्याचे निश्चित केले असावे पठाणकोट येथे प्रथम वर्ष संघ शिक्षा वर्ग सुरूअसताना दि २५ जुन १९८९ रविवार रोजी मोगा येथील नेहरूपार्क मधील शाखेवर हल्ला करण्यात आला मोगा शहरात नेहमी प्रमाणे संघाची प्रभात शाखा लागली होती रविवार असल्याने शाखे ची ५३ संख्या होती ज्येष्ठ प्रचारक चमनलालजी अर्धमंडलकार मध्ये स्वयंसेवका सोबत चर्चा करीत असताना तीन आतंकवाद्यांचा सशस्त्र गट शाखेवर चालून आला त्यांनी स्वयंसेवकांवर प्रचंड अंधाधुंद गोळबार केला १२८ गोळ्या झाडून शाखेतील २६ स्वयंसेवकांना तेथेच वीरमरण आले तसेच शाखेवारील सर्वच स्वयंसेवक जखमी सुध्दा झाले होते गोळीबार करून आतंकवादी पळून गेले ही बातमी संपूर्ण देशात पसरली दुसऱ्या दिवशी देशातील अनेक भागात निषेध मोर्चे काढले गेले सरकार्यवाह श्री शेषाद्री यांनी हिंदू-शिख बंधू मध्ये सामाजिक कटूता निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले स्वंयसेवकांनी आपल्या नेत्यांच्या आवाहन नुसार देशात शांततापूर्ण निषेध केला कोठेही सामाजिक सलोखा बिघडणार याची काळजी सुध्दा घेतली गेली होती पंजाब मधील संघ संपविण्याचा प्रयत्न ?

पंजाब मध्ये हिंदू-शिख वैमनस्य निर्माण करण्यासाठी पाकिस्तान पुरस्कृत आतंवाद्यांकडून बरेच प्रयत्न झालेले होते पण संघ कार्यकर्त्यांच्या सतर्कते मुळे विघातक शक्ती यशस्वी होऊ शकत नव्हत्या संघ कार्य, संघाच्या शाखा त्यांच्यासाठी मोठा अडसर होत्या त्यामुळे पंजाब मधील संघ संपविण्या साठी त्यांनी मोगा संघ शाखेवर सुनियोजित केला होता कारण जेथे हल्ला झाला त्या नेहरूपार्क मध्ये गोळीबार हल्ल्याच्या काही तासातच दोन शक्तिशाली बॉंबस्फोट सुध्दा झाले होते व त्या मध्ये सुध्दा काही पोलिस कर्मचारी मृत्युमुखी पडले होते संघ शाखेवर हल्ला करून पाक पुरस्कृत आतंकवाद्यांना पंजाब मधील संपविण्याचा डाव होता परंतु स्वयंसेवक घाबरले नाहीत हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी नेहरू पार्क मध्ये त्याच जागेवर शाखा पूर्वरत लागली होती वीर मरण आलेल्या व जखमी परीवारातील सदस्य व स्वंयसेवक एकूण २५३ संख्या संघाच्या शाखेवर उपस्थित होती. "कौन कहंदा हिंदू-सिख वख ने, ऐ भारत मां दी सज्जी खब्बी आंख ने" याचा अर्थ कोण म्हणते हिंदू सिख अलग आहेत ते तर भारतमातेचे दोन डोळे आहेत सांघिक गीत म्हणत हिंदू-सिख एक आहोत हा संदेश संघ शाखेवरून देण्यात आला होता तसेच आम्ही घाबरलो नाही किंवा शिख विरोधी सुध्दा नाही हा संदेश न कळत आतंकवाद्यांना देण्यात आला मोगा शाखेवर हल्ल्या करून आतंकवाद्यांना पंजाब मधील संघ बंद करायचा मनसुबा होता परंतु सदर घटनेमुळे पाकपुरस्कृत आतंकवादाचे वादळ शांत करण्यासाठी सामान्य माणूस संघा सोबत मोठ्या शक्तीने उभे झाला संघ कार्य सुध्दा उभे झाले होते. देशात जेव्हा काही समस्या उभ्या राहतात तेव्हा संघ मोठ्या ताकदीने उभा राहून निर्माण झालेल्या समस्याचे मूळ शोधून त्याचा बीमोड करण्यासाठी उभा राहतो हा इतिहास आहे त्याच प्रमाणे पाकिस्तानाने पंजाब मध्ये उभा केलेला खलिस्तानी आतंकवाद व हिंदू-सिख मध्ये निर्माण केलेली कृत्रिम वैचारीक दरी हळू हळू समाप्त केली आहे ज्या नेहरू पार्क मध्ये २६ स्वयंसेवकांचे बलिदान झाले होते त्या नेहरू पार्क चे स्थानिक नागरिकांनी शहीदी पार्क नामकरण करून तेथे संघाचे कार्यालय सुध्दा उभे करण्यात आले आहे गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या स्वयंसेवकांच्या परिवारास तत्कालीन पंजाब सरकारने रू वीस हजार आर्थिक मदत दिली होती ती रक्कम शहीद परिवाराने संघ कार्यालयास अर्पण केली होती दर वर्षी २५जुन रोजी शाहिदी पार्क मोगा बलिदानी स्वयंसेवकांच्या स्मरणार्थ विविध कार्यक्रम घेऊन त्यांचे स्मरण केले जाते.

# वसा आणि वारसा हा नेहमीच संस्कारांचा सर्वश्रेष्ठ ठरतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण जन्माने कोणाचे वारसदार आहेत या पेक्षाही आपण कर्म करताना कोणता वारसा चालवतो आहेत अथवा कोणत्या विचारांचा वसा घेऊन निघालो आहेत यानुसार आपलं मुल्यमापन ठरत असत. संसारातील वारसदार होण्यासाठी मर्यादा असतात पण संस्कारांचा वसा आणि वारसा हा अमर्याद असतो. आपण आपल्या पात्रतेनुसार हा वसा आणि वारसा स्वीकारू शकतो.आपण संपत्ती अथवा वंशपरंपरेने कोणाचे वारसदार आहेत या पेक्षाही आपण कोणाचे संस्कार घेऊन मार्गक्रमण करतो हे जीवनात खुप महत्वपूर्ण आहे आणि हाच वैचारिक संस्कारांचा वसा आणि वारसा चालवता आला पाहिजे.कारण जीवनात संस्कारांचा वसा आणि वारसा हाच सर्वश्रेष्ठ आहे.**

धन,द्रव्य, संपत्ती याचा वारसदार होण काही कठिण नाही पण संस्कारांचा वारसदार अथवा संस्कारांचा वसा चालवणं हे खुप कठिण असतं.पण हे कठिण कार्य ज्याला जमत तो सर्वसामान्य व्यक्ति नसतो एवढं मात्र निश्चित आहे.मानवी जीवन म्हटलं कि संसार आलाच संसार हा जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने संसारातील जीवनात काय फल निष्पत्ती होईल.हे आपल्या ज्ञानावर अवलंबून आहे.संसाराचा वारसा हा संपत्ती चा विषय असतो.परंतु संस्काराचा वारसा हा प्रमाणिकता, सत्य,न्याय,सात्विकता,याचा वसा आहे जो पुढे नेतो तो संसारात कृतकृत्य होतो.आपली समाजातील ओळख हि आपल्या कडे असणार्या साधन संपती वरून किंवा आपण धारण करत असलेल्या पदावरून होत असते हे सत्य असलं तरीही पुर्ण सत्य नसुन ते अर्धसत्य आहे.कारण आपली हि भौतिक ओळख हि खुप क्षणिक अथवा अल्प अश्या कालावधी साठी असते.म्हणजे जोपर्यंत धनसंपदा आहे किंवा धारण केलेलं पद आहे तोपर्यंतच हि ओळख टिकुन असते.हि संपदा संपुष्टात आली किंवा पद गेलं कि ती निर्माण झालेली ओळख लुप्त होऊन एक खुप मोठी पोकळी निर्माण होते. परंतु संस्कार आणि प्रमाणिकता, सत्य,न्याय याचा वसा आणि वारसा घेऊन निर्माण झालेली ओळख तहयात कायमस्वरूपी व आपल्या हयाती नंतर सुद्धा टिकुन राहते. म्हणजे पिढ्यानपिढ्या जी ओळख कायम टिकुन राहते ती ओळख संस्काराची व प्रमाणिक पणाचा असते.म्हणून सगळ्यात उत्तम मौल्यवान संपत्ती म्हणून संस्काराचा उल्लेख होतो. कुठल्याही संपत्तीने खरेदी करता येत नाही चोरी होत नाही किंवा चोरीला जात नाही ती बाब म्हणजे संस्कार आणि कुणालाही सहजासहजी जपता येणार नाही.किंवा शक्य होणार नाही.असा वसा म्हणजे प्रमाणिकपणा आणि हा वसा व वारस हा सहजासहजी मिळण किंवा मिळवणं शक्य होत नाही.प्रथा, परंपरा,रूढी याला छेद देऊन फक्त संस्कारा आणि प्रामाणिकता याचा वरसा आणि वसा कोणिही आपल्या गुणवत्तेवर चालवु शकतं यासाठी भौतिक वारस होण्याची आवश्यकता भासत नाही. पिढ्यानपिढ्या चालत आलेली वंश परपंर,धनसंपदा , नातेसंबंध नैसर्गिक नियमानुसार पुढे चालवण म्हणजे आपण याला सर्वसाधारण पणे वारसा असं संबोधतो.आणि अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या व्यक्ति आपल्या रक्तं नात्यांच्या बाहेरील व्यक्तिला सुद्धा आपला वारसा हक्क देऊ शकतो पण हा वारसा वैचारिक असुन तो प्रामाणिकता आणि संस्कारांचा असतो.एकंदरीत काय तर जो दाता आहे त्याच्या मतानुसार आपला उत्तराधिकारी म्हणून निवड केली जाते याला आपण वारसा हक्क समजतो. पण याला अपवाद हा आहे कि संस्काराचा वारसा आणि प्रामाणिकपणाचा वसा आपण कोणालाही देऊ शकत नाही.हा वसा आणि वारसा परंपरेनुसार नाही तर गुणवत्तेवर आधारित कोणीही चालवु शकतं.वसा आणि वारसा ह्या जीवनातील सगळ्यात महत्वपूर्ण बाबी आहेत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# श्रीक्षेत्र देवगीरी संत जनार्दन स्वामी महाराज पालखी उत्साहामध्ये मार्गस्थ

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**छत्रपती संभाजीनगर :** श्री संत जनार्दन स्वामी महाराज पालखी सोहळा श्री क्षेत्र देवगीरी येथून २२ जून २०२४ शनिवार रोजी दुपारी ३वा. विधीवत पूजन करुन आषाढी महोत्सवासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. दरवर्षी जेष्ठ शुद्ध पोर्णिमेच्या दिवशी पालखी निघुन नियोजीत ठिकाणी २३-२४ मुक्काम करत पालखी भजनाच्या निनादात मार्गक्रमण करत असते. या पालखी सोहळ्यात असंख्य भाविक पायीं दिंडी सोहळ्यात सहभागी होऊन जीवन कृतार्थ करुन घेतात. हभप श्री उद्धव महाराज आनंदे देवगीरी पालखी सोहळा प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होत असलेल्या या पालखी सोहळ्याची मोठी परंपरा आहे. गावागावांत पालखीचे पूजन करुन भाविक आपला माथा संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या चरणीं टेकवून आशिर्वाद घेतात. आषाढी एकादशी पर्वणीवर पवित्र चंद्रभागेचे स्नान,नगर प्रदक्षिणा पूर्ण करुन पालखी मठात विराजमान होईल. आषाढ शुद्ध गुरु पोर्णिमेच्या दिवशी गोपाळपुरात काल्याचे हरीकीर्तन होऊन काला वाटप होईल. व पालखी परतीच्या वाटेवर निघुन आषाढ वद्य एकादशीला श्री क्षेत्र देवगीरी येथे समारोप होईल. चतुर्दशी या दिवशी अभिषेक महाआरती होऊन उपस्थित वारकरी भाविक वर्ग यांना महाप्रसाद वितरण व्यवस्था करण्यात आली आहे.तरी पालखी सोहळ्यात भाविकांनी वारीचा आनंद घेऊन जीवनाची दिशा ठरवावी, असे आवाहन हभप उद्धवजी महाराज आनंदें व परीवाराने केले आहे.

# अनेकांनी माघारीसाठी केले प्रयत्न परंतु शिक्षकांसाठी मी शेवटपर्यंत ठाम : भावसार

## शिक्षक जागृत झाले; अमिषाला बळी पडणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नाशिक विभाग शिक्षक मतदार संघात आतापर्यंत नाशिक आणि नगरमध्ये शिक्षण संस्थांमध्ये जाळे असल्याने त्यांचेच वर्चस्व होते. धुळे-नंदुरबार,जळगावमध्ये मतदार संख्या कमी असल्याने वर्चस्व नव्हते. परंतु आता खान्देशातून मी एकमेव उमेदवार असल्याने खान्देशचे वर्चस्व आणि आमदार देण्याची संधी शिक्षकांना चालून आली आहे. त्यामुळे शिक्षकांनी हक्काचा उमेदवार म्हणून मला उमेदवार करावे.असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार ॲड.महेंद्र भावसार यांनी केले आहे.

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आज दुपारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ॲड.भावसारांनी केले. नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणुक अत्यंत वादग्रस्त आणि विविध घटकांनी आज अंतीम टप्प्यात येवून पोहचली आहे. पूर्वी ही निवडणुक शिक्षक संघटनांची होती. राजकीय पक्ष बाहेर होते. परंतु आता निवडणुक राजकीय पक्षांच्या हाती गेली आहे. खुद्द मुख्यमंत्री देखील उमेदवारासाठी मैदानात उतरले. त्यांच्या उमेदवाराचा पराभव दिसत असल्याने ते मैदानात उतरले आहे. माघारीच्या विनंतीसाठी मुख्यमंत्र्यांनी फोन केल्याचे ॲड.भावसार यांनी सांगितले. या निवडणुकीत होणारा पैशांचा महापुर आणि अमिशाला बळी न पडता शिक्षकांनी मतदान करावे असे आवाहनही त्यांनी केले. शिक्षक मतदार संघ म्हणजे आपल्या घरातील आजोबा-पंजोबांचा राजकीय वारसा जपण्यासाठी घरातील सदस्याला या मागील दाराने राजकारणात प्रवेश द्यावा यासाठी शिक्षक मतदार निवडणुकीकडे बघितले




जात आहे आणि रिंगणात असलेले बहुतांश उमेदवार हे कारखानदार मद्यसम्राट अथवा राजकीय पाठबळ असलेले उमेदवार आहेत. या सर्व धावपळीत मी गेल्या ३५ वर्षांपासून केवळ शिक्षकांसाठी लढणारा वकील आहे. न्यायालयातून शिक्षकांचा लढा कायद्यातील त्रुटींमुळे अपयशी ठरत असल्याचे लक्षात आल्यामुळे हा लढा विधानसभेकडून शिक्षक आमदार म्हणून सुरु ठेवावा या हेतूने उमेदवारी केली आहे. या निवडणुकीच्यानिमित्ताने प्रचार करताना शिक्षकांकडून मला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून माझा विजय होईल असा दावाा ॲड. भावसार यानी केला. या पत्रकार परिषदेला ॲड.महेंद्र भावसार यांच्यासोबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष सारांश भावसार, सुमित पवार उपस्थित होते. विधान परिषद आणि शिक्षक आमदार हे पद का निर्माण करण्यात आले? याचाही शिक्षकांनी सखोल विचार करावा,जनरल निवडणुकीतून निवडून आलेले विधान सभेतील आमदार कुठल्याही विषयात तज्ञ असतील असे नाही,अशावेळी एखाद्या विषयावर विधानसभेमध्ये निर्णय घ्यायचा असेल तर तेथे त्या विषयातील तज्ञाची आवश्यकता भासते. म्हणून विधानपरिषदेची निर्मिती करण्यात आली आहे. विधाान परिषद ही तज्ञ व्यक्तींची आहे. तर विधाानसभा ही जनरल निवडुन आलेल्या लोकप्रिय सभासदांची आहे. विधानसभेत शिक्षण धोरण ठरविताना अथवा शैक्षणिक शासन निर्णय करताना अथवा शैक्षणिक कायदे करताना विधाान परिषदेचे शिक्षक आमदाराचे तज्ञ मार्गदर्शन मागविले जाते. आणि त्या आधारे शिक्षणाचे पुढील धोरण ठरविण्याच्या दृष्टीने शैक्षणिक कायदे करण्याच्या दृष्टीने शिक्षकांना मतदान करताना आपण निवडुन दिलेला आमदार हा आपल्या शिक्षण क्षेत्रातील भविष्यातील महत्वाचे निर्णय घेवून याची जाणीव ठेवून आणि त्या दृष्टीने अभ्यासू उमेदवाराला मतदान करावे असे आ.महेंद्र भावसार म्हणाले.

# गरीब विद्यार्थी सहायता निधीतून मदतीचा हात !

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** ता. जामनेर ( ता . २ १ ) दातृत्व हा एक अलौकिक असा सद्गुण असून शालेय वयातच विद्यार्थ्यांच्या बालमनावर दातृत्वाचा संस्कार बिंबविण्याचा प्रयत्न सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात होत आहे.

साधारणपणे वाढदिवसानिमित्त विद्यार्थी आपल्या मित्रांना शिक्षकांना चॉकलेट किंवा खाऊ वाटप करतात. परंतु आपल्या वाढदिवसानिमित्त आपण गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी जर काही मदत केली तर नक्कीच ती उपयोगी ठरू शकते, ही संकल्पना शाळेतील उपक्रमशील शिक्षक शंकर रंगनाथ भामेरे यांनी राबविली. त्यांनी वाढदिवसानिमित्त दोन वर्षांपूर्वी शाळेला गरीब विद्यार्थी सहायता निधी पेटी भेट देऊन उपक्रमाची मुहूर्तमेळ रोवली . मागील दोन वर्षांमध्ये या 'गरीब विद्यार्थी सहायता निधीच्या माध्यमातून विष्णू गणेश कुमावत हिवरखेडा, वैष्णवी दत्तू घोंगडे, खुशी ज्ञानेश्वर घोंगडे, प्रतीक संजय पडोळ लोंढरी यांच्यासह गरजू विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी भरीव मदत झालेली असून खर्चाणे येथील गरजू विद्यार्थ्यांना चप्पल, बूट वाटप करण्यात आले आहेत.

विद्यार्थी शिक्षक आपल्या वाढदिवसानिमित्त या पेटी मध्ये यथाशक्ती रोख स्वरूपात देणगी टाकतात. तसेच शाळेत येणारे अभ्यागत, पालक आपल्या शाळा भेटीदरम्यान सदर पेटीमध्ये स्वेच्छेने यथाशक्ती देणगी टाकतात. मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली वसंत घोंगडे , लिपिक प्रकाश अनंतराव जोशी आणि गरीब विद्यार्थी सहायता निधी वितरण प्रमुख हरिभाऊ भानुदास राऊत यांच्या समन्वयातून गोरगरीब गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत, शैक्षणिक गरज तसेच पालकांच्या वैद्यकीय उपचारासाठी मदत निधी दिला दिला जातो. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या हातांना दातृत्वाच्या सुगंधाचा स्पर्श होऊन त्यांच्यातील माणुसकी जोपासली जात असल्याच्या प्रतिक्रिया पालक व्यक्त करीत आहेत.



# ग्रामसेवक गावात येईना; नागरिकांची कामे आडली

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे ग्रुप पिंपळवाडी व महाल्बदा येथील ग्रामसेवक गोरे हे महाशय गावातील ग्रामपंचायत कार्यालय ठिकाणी येत नसल्यामुळे, त्यांच्या सततच्या गैरहजेरीमुळे गावातील अनेक नागरिकांची तसेच शाळेतील मुलांची ग्रामपंचायत कार्यालयातील कामे वेळेवर होत नाही. प्रशासनाचे आदेशाला केराची टोपली दाखवली आहे सततच्या गैरहजर राहिल्याने ग्रामस्थ व विद्यार्थी वैतागले आहेत त्यामुळे अनेकांना याचा तास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायत मधील विविध प्रमाणपते दाखले देण्याचे काम ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून कार्य करणारे ग्रामसेवक यांच्याकडे असते परंतु जवळपास पंधरा ते वीस दिवसापासून संबंधित ग्रामसेवक गावात न आल्यामुळे अनेकांची कामे रखडले असून त्याामुळे ग्रामस्थांची गैरसोय होत आहे. याबाबत संबंधित ग्रामस्थांनी यांनीही गटविकास अधिकारी यांच्याकडे तोंडी तक्रार केलेली आहे. या बाबीकडे गट विकास अधिकारी, सोयगाव यांनी लक्ष देऊन संबंधित ग्रामसेवक यांना मुख्यालय राहण्यासाठी लेखी आदेश काढून गावकऱ्यांसह विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी किंवा संबंधित ग्रामसेवक यांची बदली करून या ठिकाणी नवीन कर्तव्यदक्ष ग्रामसेवक यांची नियुक्ती करावी, अशी ग्रामस्थांकडून व विद्यार्थ्यांकडून मागणी होत आहे.

# सगे-सोयरे अध्यादेश रद्द करण्यासाठी ओबीसींचा रस्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** ओबीसींच्या कोट्यातून मराठा कुणबी सगे सोयरे यांना जाहीर केलेले आरक्षण तात्काळ रद्द करा तसेच वडीगोद्री येथील उपोषणाला पाठिंबा म्हणून ओबीसी समाज बांधवांनी देऊळगाव राजा चिखली मार्गावरील सिनगाव जहागीर फाट्यावर रस्ता रोको आंदोलन केले. मराठा समाजाला कुणबी सगे सोयरे म्हणून शासनाने जाहीर केलेले आरक्षण रद्द करा या मागणीसाठी ओबीसी समाज बांधवांनी सिनगाव फाट्यावर राष्ट्रीय महामार्ग रोको आंदोलन केले. सदर रस्ता रोको आंदोलनामुळे देऊळगाव राजा चिखली मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.सदर आंदोलनाला जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेता मनोज कायंदे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दीपक बोरकर यांनी संबोधित केले. तुझ्याप्रसंगी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष,गजानन काकड, हरिभाऊ वाघ,पांडुरंग गिराम,दिनकर वाघ अशोक वाघ शंकर वाघ, शंकर खरात, आकाश काकड,समाधान काकड, प्रकाश मिसाळ, आदींनी सहभाग घेतला. सदर आंदोलना प्रसंगी ठाणेदार संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# जीर्ण खांब, तारा, वडाच्या फांद्या ठरत आहेत डोकेदुखी

## महावितरणचा भोंगळ कारभार : खांबात वड का वडात खांब

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील भगवान श्रीचक्रधर स्वामी मंदिराजवळ असलेल्या विद्युत पुरवठा खांब व तार हे वडाच्या झाडाच्या विखाळ्यात सापडले आहे. या फांद्यापासून दोन वर्षे झाले आहे खालचा एक तार तुटून पडला आहे. बरे झाले आहे की तो खालचा तार दिवसा तुटला आहे. मंदीरावर नेहमी भाविक भक्तांची गर्दी असते मधला तार किंवा वरचा तुटला असता मोठा अनर्थ घडला असता सध्या महावितरणने मधल्या तारा आर्थिंग करून दोन वर्ष पुर्ण झाले आहे खांब व तार पूर्ण जिर्ण झाले आहे कधी तुटेल याचा भरवसा नाही काही जीवितहानी झाल्यास महावितरण कंपनी जवाबदार राहील असे उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांनी बोलताना सांगितले आहे.आणि असे प्राबलोम पूर्ण गावात पांदन रस्ताने पाहावयास मिळतात पण याकडे जाणीवपूर्वक महावितरण कंपनीचे कर्मचारी दुर्लक्ष करीत आहे.

पावसाळाचे सध्या दिवस सुरु आहे पावसाळा असतानाच अवकाळी पावसाने आपले उग्र रूप धारण केले आहे. या काळात सोयगाव तालुक्यातील विविध गावात वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. आधीच उष्णतेने व्याकुळ झालेल्या नागरिकांना विजेच्या या लपंडावाचा मोठा फटका बसत आहे. अवकाळी पावसाने अचानक थैमान घातल्यामुळे महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच झोप उडाली आहे. अनेक ठिकाणी वीज वितरण कंपनीचे जीर्ण झालेले खांब तसेच विद्युत वाहिनीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या ही परिसरात ग्रामस्थांची सर्वांची डोकेदुखी बनली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून परिसरात अवकाळी वादळी वारे व पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जीर्ण झालेले विद्युत खांब तर काही ठिकाणी डिपी कोसळत आहेत.असे प्रकार नेमकेच टिटवी पळसखेडा गावात पाहायला मिळाले आहे.तर ठीक ठिकाणी विद्युत वाहिनीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या पडतात. त्यामुळे वीज वाहिनी तुटते. रात्रभर ग्रामस्थांना मच्छारा सोबत काढावी लागते. त्याचबरोबर इतर अनेक समस्यांना वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. या वीज वाहिनीवर असणारी झाडे तोडण्यास परवानगी नसल्याने वीज वाहिनीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून वीज पुरवठा सुरु करण्यासाठी कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत पण करावी लागत आहे. पावसाळ्यापूर्वी महावितरण कंपनी झाडांच्या फांद्या तोडून वीज पुरवठा सुरळीत कसा करता येईल,यासाठी प्रयत्न करते.पण गावात लक्ष देत नाही नाही.एका बाजूला विजेचे वाजवी दर लावले आहेत. वीज वापर, वीज कर, वीज भाडे, मीटर भाडे असे विविध कर लावून ग्राहकावर लाईट बिल आकारण्यात येते. ग्राहक ते वेळोवेळी बिले भरतात. मात्र, ग्राहकांना चांगली सेवा देणे हे शासनाचेही कर्तव्य आहे. सध्या सावळदबारा परिसरात जवळपास पंचवीस गावांचा समावेश केला आहे.तसेच परिसरातील विविध गावात वीज पुरवठा वारंवार खंडित होण्याच्या घटना घडत असल्याने नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे शेतकरी वर्ग तसेच विजेवर चालणारे झेरॉक्स, पिठ चिक्की, हॉटेल व्यवसायिक, दूध संकलन केंद्र यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

सावळदबारा उपकेंद्राच्या ३३ केव्ही उच्चदाब वाहिनीची व गावातील जिर्ण झालेले विद्युत खांब व तार याची देखभाल व दुरुस्ती तातडीने करण्याची गरज असल्याचे उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांनी सांगितले आहे. जेणेकरून उच्चदाब वाहिनी बंद पडणार नाही. त्यामुळे वीज ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा सुरू राहील याची काळजी सावळदबारा 33 केव्ही महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनी घेणे गरजेचे आहे.आणि भोंगळ कारभार बंद करा असे पण राजपूत यांनी बोलताना सांगितले आहे.





# सिल्लोड येथे खासदार डॉ. कल्याण काळे यांचा विठ्ठल बदर यांनी केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथे नवनिर्वाचित खासदार माननीय डॉक्टर कल्याण काळे यांचा सत्कार करताना उपजिल्हाप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेचे विठ्ठल बदर पाटील विधानसभा संघटक रघुनाथ बापू चव्हाण, सिद्धू अग्रवाल रघुनाथ घरमोडे, संजय काळात्रे, कैलास जाधव, रामेश्वर काळे, अमोल कळात्रे, मुख्य संपादक दशरथ सुरडकर, रावसाहेब गोराडे, नारायण आहेर, लखन ठाकूर, अमोल शिंदे, गोरख शिंदे, सोमीनाथ बडक, शिवा गौर, गजानन जयस्वाल, शंकर मामा रोठे, दशरथ पाटील, सुरेश जाधव, सोयगाव तालुका संघटक गुलाबराव कोलते पाटील, शेषराव पाटील, विठ्ठल बोबडे, मुन्ना सय्यद, हुसेन शेख, गौरव जैस्वाल, सकाराम दुधे, राहुल वाघ, राजू शिरसाठ, इत्यादींच्या हस्ते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने नवनिर्वाचित खासदार माननीय डॉक्टर कल्याण काळे यांचा मोठा भव्य जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व बाळासाहेब ठाकरे गटाचे सिल्लोड, सोयगाव येथील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यावरण चळवळीत लोकसहभाग वाढवावा

## सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** स्व. आबासाहेब मोरे यांनी पर्यावरणाचे काम अखंडपणे केले. त्यांचाच आदर्श घेऊन हे मंडळ महाराष्ट्रात पर्यावरण व वृक्षसंवर्धनाचे कार्य करीत आहे. वाढती उष्णता, दाहकता लक्षात घेता पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक व्यक्तीगणिक वृक्ष लावावीत. पर्यावरण ही चळवळ होऊन त्यात लोकसहभाग वाढवावा अशी अपेक्षा निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी केले. टाकळीभान येथील पर्यावरण स्नेही व मंडळाचे जिल्हा सदस्य अर्जुन राऊत यांनी पर्यावरण पंधरवडा निमित्त टाकळीभान येथील जिल्हा परिषद शाळा आणि साईबाबा मंदिर परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे विविध बोधवाक्य तयार करून पर्यावरण आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवला. जिल्हा परिषद शाळा आणि ग्रामस्थ यांच्यावतीने मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, जिल्हाध्यक्ष लतिकाताई पवार, राज्य सचिव प्रा. अनिल लोखंडे, मीनाताई मोरे, राज्य संघटक डॉ. शरद दुधाट यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी टाकळीभान येथील कब्रस्तानमध्ये २५० वृक्षांचे रोपण व संवर्धन केल्याबद्दल नूर शेख व समशेरखा पठाण यांचा मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे व सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पर्यावरण संवर्धनासंबंधी झालेल्या बैठकीत प्रा.अनिल लोखंडे, कार्लस साठे, कवी पोपटराव पटारे, अध्यक्ष प्रमोद मोरे व सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व साईबाबा मंदिर परिसरात अर्जुन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष प्रमोद मोरे प्रा. अनिल लोखंडे, छायाताई राजपूत, लतिकाताई पवार, डॉ. वंदनाताई मुरकुटे, डॉ. शरद दुधाट, मीनाताई मोरे, अर्जुनराव राऊत यांच्यासह ग्रामस्थांच्या हस्ते १०१ वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी शिवाजी शिंदे, राजेंद्र कोकणे, मयूर पटारे, दिगंबर मगर, श्रीधर गाडे, भाऊसाहेब पटारे, अनिल कडू, ओमकार स्वामी जंगम, दत्तात्रय पटारे, भैय्या पठाण, राम बोरुडे, अक्षय कोकणे, बापूसाहेब साळवे, सागर काळे, महेश शिंदे, मुख्याध्यापक अनिल कडू, केंद्रप्रमुख शिंदे सर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय योग दिन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनियर कॉलेज येथे "आंतरराष्ट्रीय योग दिन "साजरा करण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळव शिक्षक पडूळे सर यांनी योगाचे महत्त्व व योगाचे अनेक योगासन शिकविले. विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साहात आपल्या आरोग्यासाठी योगा किती महत्त्वाचा आहे. योगाचे महत्त्व आणि प्रात्यक्षिक करून सर्व विद्यार्थी आणि शिक्षक वृंद व शिक्षकेतर पाटील वाय एस श्री कापडणे, निळ, गायकवाड, भवरे, निंभोरे, ताकटे, बनसोडे,पवार, शिंदे.दतु गायकवाड, रंजनाताई, कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहात सहभागी होऊन या कार्यक्रमाचा आनंद घेतला.



# महिलांमध्ये स्तनाचे वाढणारा कर्करोग चिंतेचा

## कॅन्सर रोगतज्ञ डॉ. मुकुल घरोटे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** सध्या भारतात मुख्यतः शहरी भागात महिलांमध्ये



स्तनाचा कर्करोग वाढत असल्याने वैद्यकीय क्षेत्रात चिंता व्यक्त केली जात असली तरी त्याबाबत महिलांमध्ये येणारी जागरुकता देखील समाधानाची बाब आहे, असे मत शिर्डी येथील साईबाबा संस्थानचे कॅन्सर रोग तज्ञ डॉक्टर मुकुंल घरोटे यांनी व्यक्त केले. डॉक्टर घरोटे म्हणाले की या आजाराची लक्षणे अशी आहेत की स्थनात गाठ निर्माण होणे स्तन आग्रहातून पाणी येणे त्वचा जाड होणे काखेत गाठी असणे ही मुख्य लक्षणे दिसल्यास तात्काळ तज्ञ डॉक्टरांकडून योग्य त्या तपासण्या करून घेतल्या पाहिजे त्यात तपासण्या नंतर रिपोर्टच्या आधारावर सुई ने तपासणी करून त्यास चालना देणारे घटक शोधले जातात त्या तीन घटकाची तपासणी केली जाते त्या रिपोर्टनुसार पहिले केमोथेरपी किंवा सर्जरी करण्याचा निर्णय घेतला जात असतो महिलांनी घाबरून जाता त्यासाठी वेळेत उपचार घेणे हे फार गरजेचे असते यामागे जी कारणे आहेत त्यात उशिरा होणारी गर्भधारणा लवकरच मासिक पाळी येणे उशिरा मासिक पाळी जाणे वाढलेली चरबी वाढते वजन डायबेटीस अशी यासाठी कारणे असल्याचे मत डॉ. मुकुल घरोटे यांनी बोलताना सांगितले त्यासाठी आपण सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून जनजागृती करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी अजितदादा सक्षम नेतृत्व

## राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबई येथे झालेल्या मेळाव्यात राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सर्व जिल्हाध्यक्ष कार्याध्यक्ष यांनी सर्व फ्रंटल सेल यांना सोबत घेऊन पक्षाची संघटनात्मक ताकत वाढविण्यावर भर द्यावा अशा सुचना देऊन प्रत्येक फ्रंटल सेल अध्यक्ष कार्याध्यक्ष यांनी पक्ष कार्यासाठी वेळ द्यावा असा आदेश दिला त्या अनुषंगानेच आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाची प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक राष्ट्रवादीचे सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण सोलापूर शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्यांक विभाग जिल्हाध्यक्ष अमीर शेख व जिल्हा समन्वयक संजीव मोरे यांनी आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकी प्रसंगी नुतन पदाधिकारी प्रकाश चंद्रकर मध्य विधानसभा कार्याध्यक्ष, प्रकाश शिंदे शहर उपाध्यक्ष सुफियान फुलारी प्रभाग 20 वॉर्ड अध्यक्ष अकिब शेख दक्षिण विधानसभा सरचिटणीस आसिफ मुजावर दक्षिण विधानसभा सचिव अल्ताफ शेख दक्षिण विधानसभा सचिव यांची नियुक्तीपत्र देऊन निवडी करण्यात आल्या.



राष्ट्रवादीच्या नेत्या आदरणीय सुनेत्रा वहिनी पवार यांची नुकतीच राज्यसभेवर खासदार पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. राज्य सरकारकडून वक्फ बोर्डाला दहा कोटी निधी मंजूर केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचं अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. मध्य विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सोडवून घ्यावा, असा ठराव एक मताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागातर्फे मंजूर करण्यात आला. अल्पसंख्याक विभागातील ख्रिश्चन समाज बांधवांचे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाध्यक्ष कार्याध्यक्ष यांनी प्रयत्न करावेत अशी विनंती अल्पसंख्यांक समन्वयक संजीव मोरे यांनी केली. राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे साहेब यांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचवून पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे मनोगत अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष अमीर शेख यांनी व्यक्त केले. लोकसभा निवडणुक होऊन गेली महायुतीला जरी चांगले यश मिळाले नसले तरीही आपण खचून न जाण्याची प्रेरणा आपले नेते अजितदादा यांच्या कडून घ्यावी आणि पुढील विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे - जुबेर बागवान कार्याध्यक्ष राष्ट्रवादी सोलापूर शहर. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला भरघोस निधीची तरतूद असेल किंवा वक्फ बोर्डाला 10 कोटीचा निधीची मंजूरी असेल अजितदादा नेहमीच अल्पसंख्यांकांच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व आहे - वसीम बुऱ्हाण प्रदेश कार्याध्यक्ष अल्पसंख्यांक महाराष्ट्र प्रदेश अजितदादाची कार्यशैली आपण जाणताच अल्पसंख्यांकांची सुरक्षा आणि विकास जर कोणी करू शकेल तर ते फक्त अजितदादाच.. सर्व बहुजनांना सोबत घेऊन जाणारे विकासात्मक नेतृत्व अजितदादा यांच्यावर निष्ठा ठेवून अल्पसंख्यांक विभागाची संपूर्ण कार्यकारिणी प्रभाग अध्यक्ष आणि वार्ड अध्यक्ष नेमून संघटनात्मक बांधणी करावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी केले.

या आढावा बैठकीस जिल्हाध्यक्ष संतोष पवार महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण, सोलापूर शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अमीर शेख,अल्पसंख्यांक शहर समन्वयक संजीव मोरे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष राजू बेळनवरू,वैद्यकीय अध्यक्ष बसवराज कोळी, दक्षिण अल्पसंख्यांक अध्यक्ष अशपाक कुरेशी, सोशल मीडिया अध्यक्ष वैभव गंगणे, दक्षिण अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष मूव्हीज मुल्ला, आदी पदाधिकारी उपस्थित होते.



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद : वेरुळ व परिसरात विश्रांती नंतर आर्द्रा नक्षत्र च्या पावसाने जोरदार आगमन केले असुन शनिवारी दुपारी सर्वत्र जोरदार पाऊस झाला आहे. तर कसाबखेडा गाव परिसरात झालेल्या पावसाने पुराचे स्वरुप आले होते. सांडपाणी बघता गावकऱ्यांनी सिमेंट रस्ता करण्याची मागणी केली आहे. मृग नक्षत्राने सुरुवात जोरदारपणे करून शेवटच्या टप्प्यात हुलकावणी दिली होती. परंतु आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने जोरदार सुरुवात करून शेतकऱ्यांना खुश केले आहे. तालुक्यात ठिकठिकाणी जोरदार पाऊस झाल्याने लागवड पेरा नंतर खरिप पिके हिरवीगार टवटवीत दिसून येत आहे.**

# चारु तांडा ते घाणेगाव तांडा रस्त्याचे निकृष्ट काम

## ठेकेदाराने लावला चुना; प्रशासन मात्र साखरझोपेत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील चारु तांडा ते घाणेगाव तांडा हा रस्ता पुढे सावळदबारा ते देवळगाव गुजरी मुख्य रस्त्याला मिळतो चारु तांडा हे सोयगाव तालुक्यात अतिशय दुर्गम भागात येत असल्याने इकडे अधिकारी, इंजिनियर कोणी इकडे फिरकून बघत नाही. चारु तांडा या दोन किमी रस्ताचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण सुरु आहे. डांबरीकरण करताना डांबराचा वापर योग्य प्रमाणात करण्याचे निर्देश आहे. परंतु डांबर कमी वापरून जुने ऑईल वापरले जात आहे. तसेच इतर साहित्यही निकृष्ट दर्जाचे आहे.रस्तावर कोणत्याही प्रकारचे साफसफाई न करता तसेच थातुरमातुर पद्धतीने ठेकेदार काम करुन घेत आहे.रोलरद्वारे दबाई कमी होत असल्याने आताच हा रस्ता ठिकठिकाणी फुटला असल्याचे ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण पवार यांनी बोलताना सांगितले आहे.मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे काम निकृष्ट नागरिकांची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीकडे करण्यात आली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सोयगाव तालुक्यात सुरु असलेल्या रस्त्यांची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असून



वरिष्ठांचे याकडे कोणतेही लक्ष नाही.चारु तांडा ते घाणेगाव तांडा सडक या मार्गावर अतिशय निकृष्ट काम सुरु असल्याचा आरोप लक्ष्मण पवार ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी केला आहे.सोयगाव तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण,बांधकाम सुरु आहे. डांबरीकरण करताना डांबराचा वापर योग्य प्रमाणात करण्याचे निर्देश प्रशासनाचे आहे. परंतु डांबर कमी वापरून जुने ऑईल वापरले जात आाहे. तसेच इतर साहित्यही निकृष्ट दर्जाचे आहे. रोलरद्वारे दबाई कमी होत असल्याने आताच हा रस्ता ठिकठिकाणी फुटला आहे. अशी पाहणी शुद्धा संघटनेचे पदाधिकारी गोकुळसिंग राजपूत, दिलीप देशमुख, सुनील चोरमारे व तालुका अध्यक्ष विजय काळे यांनी स्वाता जाऊन पाहणी केली आहे आणि निकृष्ट दर्जाचे काम चालू असल्याचे समोर आले आहे. संबंधित रस्त्यावर किती लाखाचे काम आहे, किती किमी आहे,असे अंदाज फलक लावण्यात आले नाही. संबंधित कामावर कनिष्ट अभियंता दुर्लक्ष करीत असून येऊन बघायला तयार फक्त उंटावरून शेळ्या हाकलनेचे काम करीत आहेत.कंत्राटदार व शासकीय कंत्राटदाराचा संबंध असल्याचा आरोप लक्ष्मण पवार सदस्य व ग्रामस्थांनी यांनी केला आहे.मुख्यमंत्री ग्रामसडक योजना हा रस्ता मोलखेडा, हिवरी, डाभा, देव्हारी, टिटवी, पळसखेडा, नांदा तांडा व सावळदबारा कडे जातो दोन किमी, डांबरी रस्ताची डांबरीकरण मंजुरी मिळाली आहे. बरेसचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. सदर कामाची अंदाजे किंमत माहिती नाही पण या मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने तात्काळ थांबविण्याची मागणी ग्रामस्थकडून करण्यात आली आहे.मुख्यमंत्री ग्रामसडकचे इंजिनियर्स शासकीय नियमानुसार रस्त्याचे डांबरीकरण सुरु आहे. कामाच्या ठिकाणी सर्व मटेरियलची तांत्रिक तपासणी करण्यात येते. काम सुरु असून रहदारी सुद्धा सुरु आहे. ताज्या कामावर वाहतूक झाल्याने काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. ते दुरुस्त करण्यात येत आहेत.असे उडवाउडवीची उत्तरे देण्यात आले आहे.

# धर्माबाद कॉँग्रेस तालुकाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार?

## नरेंद्र रेड्डी, दिगांबर लखमावाड, गोविंद जाधव, अवधूत सालेगावकर, विठ्ठल कोंडलवाडे, की नवीन चेहऱ्याला संधी?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजण्याच्या पूर्वीच काँग्रेस पक्षाचे मोठा चहिरा मानले जाणारे खा. अशोकराव चव्हाण हे काँग्रेस पक्षाच्या हाताची सात सोडत भाजपच्या कमळाची सात धरली त्याचाच पडसाद सर्व नांदेड जिल्हातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकाऱ्यांसह धर्माबादचे कार्यकर्ते काँग्रेसचे हात सोडून भाजपाची साथ धरली, खा. अशोकराव चव्हाण यांनी भाजपाची सात धरताच धर्माबादचे काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्षासह, उपाध्यक्ष, शहराध्यक्ष, सर्व सेलचे अध्यक्ष शहराध्यक्ष कार्यकर्ते राजीनामा देत भाजपाची सात धरून कमळ मैय झाले,लगेचच आठरावी लोकसभा निवडणूक जाहीर झाली. जे हाताचे साथ सोडून कमळाला साथ दिले ते सर्व माझी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते भाजपचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे प्रचार जोरा शोरात केले असलेतरी भाजपचे प्रतापराव पाटील चिखलीकर यांना पराभवाला समोरे जावावे लागले.धर्माबादचे काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष पदाचे राजीनामा देत दत्ताहरी पाटील चोळाखेकर हे भाजपमध्ये गेल्यापासून धर्माबाद काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष पद रिक्त झाले आहे. धर्माबाद काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्षपदी वर्णी कोणाची लागणार? हे अद्याप तरी गुलदस्त्यात आहे. वसंतराव चव्हाण लोकसभा निवडणूकमध्ये विजयी झाल्यामुळे धर्माबादच्या कार्यकर्ते यांना एक प्रकारे संजीवनी मिळाली आहे. तालुकाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार या विषयी राजकीय विश्लेषक तर्क वितर्क लावले जात आहे. नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांना काँग्रेस पक्षाची उमेदवारी जाहीर झाली होती.तेव्हा धर्माबादच्या काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ व युवा कार्यकर्ते यांच्या पाठबळ, देण्याची गरज होती, त्यावेळेस धर्माबादचे काँग्रेस पक्षाचे सर्व कार्यकर्ते एकनिष्ठेने, कोणत्याच पदासाठी, कोणत्याच अमिषाला बळी न पडता निःस्वार्थ पणे नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांचे धर्माबाद तालुक्यात जोरोमध्ये प्रचाराचे काम केले.पण एकनिष्ठेने काम करणारा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसमोर कमाळाबाईचे नांदेड जिल्हाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे पराभव झाले.ज्या प्रकारे काँग्रेस पक्षाचे तालूकाध्यक्षसह सर्व पदाधिकारी राजीनामा देत भाजपचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे प्रचार केले. त्यावेळेस राजकीय विश्लेषाकांमध्ये चर्चा अशी होती की भाजपचे उमेदवार प्रतापराव चिखलीकर यांचेच विजयी होईल असे मानले जातं होते.ज्या प्रकारे धर्माबादच्या कार्यकर्त्यांसह नांदेड जिल्हाचे कार्यकर्ते,चव्हाण परिवार या सर्वानी प्रचाराची धुरा सांभाळत वसंतराव चव्हाण यांचे विजय हे खेचून आणले.लोकसभा निवडणूक संपल्या मंग धर्माबाद तालुका अध्यक्ष पदाची निवड कधी होणार?जर होणार असेलतर नेमक कोणाची वर्णी लागणार? राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की नरेंद्र रेड्डी, दिगांबर, लखमावाड,गोविंद,पाटील जाधव,अवधूत पाटील सालेगावकर,माधव पाटील चोंडिकर,विठ्ठल कोंडलवाडे,यांच्या पैकी कोणावर तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवणार? नेमके यांच्या पैकी कोणाची वर्णी लागणार? की नवीन चाहिऱ्याला संधी मिळणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात झालू आहे.धर्माबाद काँग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षपदाचे निवडीचे काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ पदअधिकारी नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांच्या हाती सूत्र देणार काय? जर सूत्र त्यांच्या हाती मिळालेतर नेमके कोणाची वर्णी लागणार? त्यांच्या भूमिकाकडे पाहणे सुद्धा उत्सुकतेचे ठरले आहे.ज्यांचे त्यांचे कार्यकर्ते माझे अण्णा,दादा,भाऊ,साहेब यांचीच वर्णी लागणार म्हणून गाजावाजा न करता दबक्या आवाजामध्ये कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे.ज्या वेळेस काँग्रेस पक्षाची निवडी संदर्भात बैठक होईल त्याच वेळेस चित्र स्पष्ट होईल असे राजकीय विश्लेषकामध्ये बोलले जात आहे.नरेंद्र रेड्डी हे 2009 पासून कांग्रेस पक्षाचे एकनिष्ठाने काम करत आले आहे.नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनातील चढ उतारामध्ये चव्हाण कुटुंब यांच्या सोबत कार्यकर्ता म्हणून त्यांच्या सोबत आहेत.धर्माबाद नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष दिगांबर लखमावाड यांच्या नावाची सुद्धा चर्चा आहे.दिगांबर लखमावाड यांनी नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांनी ज्यावेळेस नायगाव विधानसभा मतदार संघातून निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाशी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लडवली त्यावेळेस धर्माबाद तालुक्यासह शहरात जास्तीतजास्त मते मिळवण्यासाठी उल्लेखनीय कामागिरी दिगांबर लखमावाड यांनी केली.गोविंद पाटील जाधव हे कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक आहेत.कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काँग्रेसचे वर्चस्व टिकून ठेवण्यामध्ये खारीचा वाठा आहे.तसेच लोकसभा निवडणुकीमध्ये नवनिर्वाचित खासदार वसंतराव चव्हाण यांना मते जास्तीतजास्त मिळवण्यासाठी धर्माबाद तालुक्यातील ग्रामीण भाग पिंजून काडले होते, गोविंद पाटील जाधव यांची तालुकाध्यक्ष पदी वर्णी लागण्याचे संकेत जास्त आहे, असे बोलले जात आहे.

# सुशांत अवताडे यांची शिर्डी शहर राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीसपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** नुकत्याच झालेल्या शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस बैठकीच्या निमित्ताने राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थित स्थितीत राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक राज्य महिला आयोगाच्या प्रदेश अध्यक्ष रूपालीताई चाकणकर प्रदेश युवकचे अध्यक्ष सुरज चव्हाण प्रदेश सरचिटणीस संग्राम कोते राष्ट्रवादीचे नेते रमेश गोंदकर तालुका अध्यक्ष संदीप सोनवणे शिर्डी शहर अध्यक्ष दीपक रमेश गोंदकर युवक अध्यक्ष निलेश शिंदे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीची आढावा बैठक पार पडली या बैठकीमध्ये सुशांत आवताडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिर्डी शहर सरचिटणीस पदी निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब यांच्या हस्ते देण्यात आले सुशांत अवताडे हे यापूर्वी त्यांनी शिर्डी शहर युवकाच्या संघटन पदाची जबाबदारी पार पडली.
राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे काम त्यांनी युवक संघटन मोठ्या प्रमाणात मजबूत केले याची दखल घेऊन राष्ट्रवादीचे नेते रमेश गोंदकर तालुकाध्यक्ष संदीप सोनवणे यांनी सुशांत अवताडे यांना शिर्डी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीस पदाची जबाबदारी द्यावी, अशी सूचना शिर्डी शहराध्यक्ष यांना दिल्ली प्रदेशाध्यक्ष यांच्या उपस्थित पार पडलेल्या बैठकीमध्ये सदरच्या निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस संग्राम कोते, राष्ट्रवादीचे नेते रमेश गोंदकर, गौतम चे बाबासाहेब कोते, तालुका अध्यक्ष संदीप सोनवणे निलेश कोते, अमित शेळके, अनिल कोते, शहराध्यक्ष दीपक रमेश गोंदकर, युवक अध्यक्ष निलेश शिंदे, विद्यार्थीचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल सुपेकर या निवडीचे स्वागत करून अभिनंदन केले.



# विजेच्या धक्क्याने दोन मुलींचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** जिल्ह्यातील काळेगाव येथे कुलरमधून विजेचा जोरदार धक्का बसल्याने दोन चिमुकल्या मुलींचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी दुपारी घडली. या प्रकारच्या वारंवार घडत असलेल्या घटनांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यातील काळेगाव येथे उन्हाळ्याची सुट्टी असल्याने दोन मुली आपल्या मामाच्या घरी आल्या होत्या. रविवारी दुपारी त्या घरात खेळत होत्या. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला तरी घरात कुलर सुरू होता. या कुलरला त्या दोन चिमुकल्या मुलींचा नकळत स्पर्श झाला. या कुलरमध्ये विजेचा प्रवाह होता. कुलरमधून त्या दोन मुलींना विजेचा जोरदार धक्का बसला. त्यामध्ये दोन्ही चिमुकल्या मुलींचा घटनास्थळीच मृत्यू झाला. काही वेळानंतर ही घटना समोर आली. इशाली प्रवीण ढोले आणि प्रियांशी सोपान मेतकर असे त्या मुलींची नावे आहेत. घटनेचा पंचनामा करण्यात आला. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. उन्हाळ्यामध्ये वाढत्या तापमानात घरात थंडावा राहण्यासाठी कुलरचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र, थंडावा देणारा कुलरच जीवावर उठला आहे.




# आ. सतीश चव्हाण यांच्याकडून भजनी मंडळास साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**ममुराबाद :** लोकप्रिय आ. सतीश चव्हाण याच्या संकल्पनेतुन ममुराबाद येथे टाळ, विणा, पेटी पकवाज भजनी मडळांना देण्यात आले. उपस्थित भजनी मडळ महिला मडळ व गावकरी मंडळी गावकरी उपस्थित होते जावेद पटेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग तथा ग्रुप ग्रामपंचायत शेलगाव जानेफळ ममराबाद तंटामुक्ती अध्यक्ष अनिल चव्हाण, खुलताबाद तालुका अध्यक्ष विठू मालकर समता परिषद अध्यक्ष उपसरपंच कृष्णा गावंडे मा. सरपंच आप्पासाहेब वेताळ जिल्हा उपाध्यक्ष अल्पसंख्यांक सेल नजीर पटेल शिवाजी पाटील जनार्धन वेताळ विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन रउप पटेल विविध कार्यकारी सोसायटी सदस्य शिवाजी जेठे ज्ञानेश्वर बापू वेताळ संतोष तुकाराम वेताळ बंडू रामचंद्र वेताळ भाऊसाहेब वेताळ वसंत वेताळ सोपन मच्छिंद्र वेताळ योगेश देवराव आहेर सोमीनाथ आदमाने लहू वेताळ गणेश आदमने संतोष आदबने कारभारी जेठे प्रकाश जेठे एकनाथ जेठे भानुदास जेठे पंडित जेठे नामदेव जेठे सुखदेव जेठे जनार्दन जेठे लक्षिमन जेठे गावकऱ्यांनी आ. सतीश यांचे आभार मानले.



# नवरगावची भार्गवी बोरकर एसएससी परीक्षेत जिल्ह्यात प्रथम

## पुनर्तपासणीत झाली ८ गुणांची वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव येथील भारत विद्यालयाची विद्यार्थिनी भार्गवी अनिल बोरकर हिने एसएससीच्या परीक्षेत 'बेस्ट फाईव्ह 'मध्ये ५०० पैकी ४८६ गुण प्राप्त करीत ९७.२० टक्के गुण मिळवून जिल्ह्यातून गुणानुक्रमे द्वितीय येण्याचा मान पटकावला होता. परंतु मिळालेल्या मार्कंनी समाधान न झाल्याने व स्वतः सोडविलेल्या पेपरचा पूर्ण विश्वास असल्याने भार्गविणे पुनर्तपासणी करण्याचा निर्णय घेतला. तिच्या या निर्णयाला पालकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. आणि पुनर्तपासणीत तब्बल ८ गुणांची वाढ झाल्याने आता भार्गवी बोरकर हिने आपण जिल्ह्यात प्रथम असल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, सलग चौथ्यांदा जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेत प्रथम येण्याचा बहुमान चंद्रपूर जिल्ह्यातील नवरगावच्या भारत विद्यालयाने मिळविला आहे. त्यामुळे भारत विद्यालयाच्या सर्व शिक्षकवृंदावर शैक्षणिक क्षेत्रातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नवरगावची भार्गवी व तिच्या पालकांनी दहावीच्या निकालानंतर सोशल सायन्स विषयात गुण कमी मिळाल्याने पुनर्परिक्षणासाठी सामोरे जायचे ठरविले. त्यानंतर दहावी बोर्डात सबंधित विषया संदर्भात पुनर्तपासणी करण्याची मागणी करण्यात आली, सबंधित विषयाच्या पुनर्तपासणीत नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात इतिहास विषयात १ तर भूगोल विषयात ७ गुण वाढले असल्याने एकूण ८ गुणांची वाढ झाल्याने ५०० पैकी ४९४ गुण प्राप्त झाले. त्यामुळे गुणांच्या टक्केवारी सुद्धा वाढली असून भार्गवीला आता ९८.८० टक्के मार्क्स मिळाले आहेत. एकूण टक्केवारीत झालेल्या वाढीने एसएससी परीक्षेत जिल्हयातून प्रथम असल्याचा दावा तिच्या पालकाकडून करण्यात आला आहे. या निकालानंतर सलग चौथ्यांदा चंद्रपूर जिल्लाह्यातून प्रथम येण्याचा मान भारत विद्यालयाला प्राप्त झाला असून, तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# निराधारांच्या अनुदानाबाबत सुधीर मुनगंटीवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत राज्यातील निराधार व्यक्तिंना शासनाकडून दरमहा 1500 रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. मात्र जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांचे अनुदान एप्रिल महिन्यांपासून प्राप्त न झाल्यामुळे निराधार व्यक्तिंना अडचणीचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात येताच वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री सुधीर यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना अनुदान तातडीने वितरित करण्यासाठी कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. निराधार व्यक्तींचे रखडलेले अनुदान लवकरात लवकर वितरीत करण्यासाठी प्रयत्न करावा, अशी विनंती पत्राद्वारे केली आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना एप्रिल 2024 ते आजतागायत संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान प्राप्त न झाल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्याअनुषंगाने संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुदान जिल्हा स्तरावर वितरीत करण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत, अशी विनंती पालकमंत्री मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्रीशिंदे यांना पत्राद्वारे केली आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी आमदार असताना निराधारांसाठी विधानसभेत आवाज उठविला होता. त्यानंतर अर्थमंत्री झाल्यावर त्यांनी निराधारांसाठी असलेले 600 रुपयांचे अनुदान 1200 रुपये केले. मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे यात पुन्हा वाढ होऊन हे अनुदान 1500 रुपये करण्यात आले होते, हे विशेष.

# बांबू संशोधन प्रशिक्षण संस्थेला अग्रगण्य संस्था करणार

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** बांबू क्षेत्रात संशोधन प्रशिक्षण आणि कौशल्य विकासासाठी असलेली चिचपल्ली (जि. चंद्रपुर) येथील बीआरटीसी ही देशात एकमेव संस्था आहे. संशोधनासोबतच रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. बांबू तसेच उद्योग क्षेत्रात चालना देणारी देशातील ही एक अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपास नक्की येईल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. वन अकादमी येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा (बीआरटीसी) आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक अशोक खडसे, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, मुकेश टांगले, भूषण येरगुडे, अपर संचालक मनिषा भिंगे, डॉ. मंगेश गुलवाडे, प्रकाश धारणे आदी उपस्थित होते.

4 डिसेंबर 2014 रोजी बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्थेची निर्मिती झाली असून राज्याच्या वनविभागाची ही एक स्वायत्त संस्था आहे, असे सांगून वनमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, जिल्ह्यात ताडोबा - अंधारी हा जगप्रसिद्ध व्याघ्र प्रकल्प आहे. ताडोबातील बफर झोनमधील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या अर्ध्या क्षेत्रात अनुदानावर बांबू लागवडीसाठी प्रवृत्त करावे. सोबतच भाजीपाला क्लस्टर सुद्धा देता येईल का, याचा विचार करावा. या संस्थेतील फायर फायटिंग व्यवस्था अतिशय अत्याधुनिक, तंत्रशुद्ध व अचूक असावी. सादरीकरणांमध्ये ज्या बाबी ठरविण्यात आल्या आहेत, त्याचे प्रमुख उद्दिष्ट ठरविणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत सविस्तर आराखडा तयार करून टाटा ग्रुप, अदानी ग्रुप, दालमिया यांच्याशी सुद्धा बांबू उत्पादनाबाबत चर्चा करावी. सोबतच बांबू लागवड आणि उत्पादनासाठी लघु व सूक्ष्म उद्योग (एम. एस. एम. ई.)अंतर्गत काही नियोजन करता येते, का त्याचा सुद्धा अधिकाऱ्यांनी अभ्यास करावा. बांबू लागवड, उत्पादन व त्यातून कौशल्य विकास या संदर्भात पीएम विश्वकर्मा योजनेत या बाबींचा समावेश करण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या. यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर म्हणाले, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने देशात बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था (बीआरटीसी) ही भारतात एकमेव संस्था उभी राहिली आहे. प्रशिक्षणासोबतच शिक्षण, त्याचे सादरीकरण त्यातून रोजगार याबाबतीत ही संस्था देशपातळीवर नावारूपास येणे गरजेचे आहे. राज्यातील शेतकऱ्यांना सुद्धा या संस्थेमध्ये बांबू विषयक प्रशिक्षण देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. सादरीकरणात बीआरटीसी चे संचालक अशोक खडसे म्हणाले, समाज, नागरिक आणि उद्योगांच्या प्रगतीसाठी बांबूक्षेत्रात स्वयंरोजगार निर्माण करणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. बीआरटीसी अंतर्गत बांबू टेक्नॉलॉजी मध्ये डिप्लोमा, शेतकऱ्यांना प्रशिक्षण आणि बांबू व्होकेशनल ट्रेनिंग देण्यात येत आहे. सोबतच महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या सहकार्याने सहा ठिकाणी सुविधा केंद्र (सीएफसी) सुरू करण्यात आले आहे. तसेच पोंभूर्णा येथे बांबूपासून अगरबत्ती निर्मिती युनिट सुद्धा कार्यान्वित करण्यात आले आहे. बांबू पासून निर्माण करण्यात आल्या वस्तूंची विक्री चंद्रपूर, मोहर्ली, कोलारा आणि बल्लारपूर येथे होत आहे. भविष्यात येथे विविध प्रशिक्षण आयोजित होणार असल्यामुळे वसतिगृहाची निर्मिती, इंडक्शन किचनसाठी इलेक्ट्रॉनिक वस्तू, आग प्रतिबंधक व्यवस्था व त्याची देखभाल दुरुस्ती, पाणी शुद्धीकरण प्रकल्प, इंटरनेट आणि वायफाय सुविधा, डिजिटल लॅब, टिशू कल्चर लॅब, ऑडिटोरियम, सौर ऊर्जा व्यवस्था, वाहतुकीसाठी 30 आसन व्यवस्थेची बस, परिसरात सादरीकरणासाठी डिस्प्ले युनिट्स, एक्जीबिशन हॉल, आरोग्य केंद्र, क्रीडा सुविधा, कंप्यूटर लॅब, लायब्ररी, आदींचा विस्तार करण्यात येणार आहे. सन 2017 पासून डिप्लोमा इन बांबू टेक्नॉलॉजी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असून जून 2024 पासून विद्यार्थी क्षमता 30 करण्यात आली आहे. सन 2023 - 24 मध्ये बांबू निर्मिती, हॅंडीक्राफ्ट आणि कौशल्य विकास, फर्निचर बनविणे, निवासी व अनिवासी शेतकरी प्रशिक्षण, बांबूपासून ज्वेलरी, बास्केट, आदी संदर्भातील 17 प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले असून यात 516 नागरिक सहभागी झाले होते. आगामी काळात नवीन फॉरेस्ट गार्ड साठी बांबूबाबत मूलभूत प्रशिक्षण, विदर्भ आणि राज्यस्तरावरची कार्यशाळा, बांबू क्षेत्रातील उत्कृष्ट कारागीर आणि तज्ज्ञांद्वारे कॉन्फरन्स, व्होकेशनल ट्रेनिंग, शेतकरी ट्रेनिंग आदी घेण्याचे नियोजन आहे, असे अशोक खडसे यांनी सांगितले. बॉटनिकल गार्डनच्या नियामक मंडळाची सभा : विसापूर येथे असलेल्या श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बॉटनिकल गार्डनच्या नियामक मंडळाची सभा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रस्तावित बाबींना मान्यता देऊन उर्वरित कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. बॉटनिकल गार्डनबाबत क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी सादरीकरण केले.



# निरेतून धावू लागली पीएमपीएमएलची बस

## खंडीत झालेल्या सेवेला पाठपुराव्याने मिळाली गती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली दीड वर्षापूर्वी निरेतून पीएमपीएमएलची बससेवा पुण्याच्या दिशेने सुरू करण्यात आली होती.परंतु ही सेवा खंडित झाल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोईस सामोरे जावे लागत होते. पीएमपीएमएलची बससेवा पुन्हा सुरू व्हावी म्हणून अनेक जण प्रयत्न करत होते. अखेरीस या प्रयत्नांना यश आलेले आहे.खंडीत झालेल्या सेवेला पाठपुराव्याने गती मिळाली असून तब्बल दीड वर्षानंतर पीएमपीएमएलची बस पुन्हा निरा ते हडपसर धावू लागली आहे.या बससेवेचा लोकार्पण सोहळा रविवार दिनांक २३ जून रोजी संपन्न करण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निरा शहराध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य प्रमोद काकडे आणि ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण यांनी विशेष पत्रव्यवहार व पाठपुरावा केल्याने बससेवा सुरू होण्यास गती मिळाली.या लोकार्पण सोहळ्यास पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ.दिगंबर दुर्गाडे,विराज काकडे,राजेश चव्हाण,अमोल साबळे, योगेंद्र माने, अशोक रणदिवे, सरपंच तेजश्री काकडे, ग्रामपंचायत सदस्य संदीप धायगुडे, अभिषेक भालेराव, तनुजा शहा, गणपत लकडे,अजित सोनवणे, नाना हेंद्रे, दादासाहेब गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे आदींसह निरा शहरातील सर्व पक्षीय नेते पदाधिकारी नागरिक उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रमोद काकडे म्हणाले की,रविवार दिनांक २३/६/ २०२४ रोजी हडपसर निरा हा रूट सुरू केलेला आहे.डॉ.संजय कोलते यांच्या कडे वारंवार पाठपुरावा केला होता.आमचे नेते आदरणीय अजित दादा पवार यांनी तात्काळ आदेश दिले की,बंद असलेली बससेवा सुरू करण्यात यावी. आमच्या नेत्यांना धन्यवाद देतो की,पुरंदरकरांसाठी एक चांगलं गिफ्ट दिलं.बारामती लोकसभे मध्ये आमच्या पक्षाला यश आलं नाही.पण विकासाचा वादा अजित दादा हे जे वाक्य बोललं जातं ते काही खोटं नाही.इथून पुढे येणाऱ्या काळामध्ये केंद्रातून जास्तीत जास्त निधी आणण्याचं काम बारामती लोकसभा मतदारसंघात आदरणीय सुनेत्रावहिनी पवार,अजितदादा पवार यांच्या माध्यमातून होईल.अशी मी ग्वाही देतो.याचे सर्व श्रेय निरेकर ग्रामस्थ,महायुतीचे पदाधिकारी व प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न केले.त्या सर्वांचे मी आभारी आहे.कारण गेली दीड दोन वर्षापासून ही बस सेवा चालू व्हावी.म्हणून प्रत्येक जण आपापल्या परीने प्रयत्न करत होते. पीएमआरडीच्या हद्दीच्या बाहेर बस रूट असल्यामुळे सदर बस रूट चालू होत नव्हती. दादांच्या आदेशामुळे हडपसर निरा आणि हडपसर वीर ह्या दोन्ही रूट चालू होतात. दिवसाला बावीस फेऱ्या ह्या निरा ते हडपसर या मार्गावर आहेत.तर या मार्गावर प्रवास फेऱ्या करताना दिवसाचा पास हा १२० रुपये आहे आणि महिन्यांचा चाकरमान्यानांचा पास हा दीड हजार रुपये आहे.असे सुद्धा प्रमोद काकडे यांनी म्हटले. ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण म्हणाले की, निरा गावांमध्ये गेली दीड वर्षापूर्वी पीएमपीएमएल बस सेवा चालू होती.कालांतराने ती खंडित झाली आणि त्यानंतर मी आणि स्वतः प्रमोद काकडे, अजित दादांकडे दोन तीन वेळा भेटीला गेलो.परंतू मधल्या काळामध्ये आचारसंहिता असल्यामुळे थोडासा विलंब झाला.परंतु त्यावेळेस आम्ही अजित दादांना सांगितलं होतं की, निरेची पूर्वीची बस चालू होती.ती पूर्ववत करण्यासाठी, तुम्ही पीएमपीएमएलच्या अधिकाऱ्यांशी थोडंसं बोला,त्यानंतर अजित दादा पवार यांनी पीएमपीएमएलचे अध्यक्ष डॉ.संजय कोलते यांना फोन वरून सांगितलं की,पूर्वी ज्या बससेवा निरा, वीर, मोरगाव असेल, ज्या गाड्या चालू होत्या.त्या तुम्ही चालू कराव्यात. परंतु मधल्या काळामध्ये एसटीचा ज्यावेळेस संप होता. त्यावेळेस खरंतर आमच्या निरा व निरा लोकांना ही पीएमपीएमएल जी चालु झाली.त्यातून लोकांना उत्कृष्ट सेवा मिळाली.पीएमपीएमएलला ही चांगला इनकम झाला.पुणे हे विद्येचे माहेरघर आहे.शिक्षणासाठी जाणारी मुलं मुली असतील किंवा जेजुरी एमआयडीसीमध्ये या निरेतून भरपूर लोकं,महिला वर्ग हे रोजगारासाठी जात असतात. त्यांना ह्या बससेवेची चांगली सोय झाली. खरंतर महायुतीच्या माध्यमातून सर्वांच्या प्रयत्नातून ही बससेवा सुरू झालेली आहे.आम्ही गावकऱ्यांच्या वतीने पाठपुरावा केला.बस सुरू झाली.ही आमच्या निरेकरांसाठी आनंदाची बाब आहे.यावेळी पीएमपीएमएलचे बस ड्रायव्हर व कंडक्टर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार व सुनेत्रावहिनी यांची राज्यसभा खासदारपदी निवड झाल्या नंतर पुरंदर बारामती आणि फलटण लोणंद खंडाळा तालुक्यातील नागरिकांना प्रवासासाठी पीएमपीएमएल सुरु करून दिली.त्याबद्दल अजितदादा पवार व सुनेत्रा पवार व पीएमपीएमएलचे अध्यक्ष डॉ.संजय कोलते,व्यवस्थापक गव्हाणे, हडपसर डेपो मॅनेजर वाळुंजकर व खोडके भामे व सर्व स्टापचे निरेकरांच्या वतीने आभारी असल्याचे म्हटले आहे.

# रोजगार हमी योजनेचा बिहार पॅटर्न राबवून विधवा महिलेने फुलवले माळरान

## शरदवाडी येथील गावचा कायापालट

आधुनिक केसरी न्यूज

**कवठे येमाई :** शिरूरच्या बेट भागातील शरदवाडी येथील जयश्री भिमाशंकर सरोदे या विधवा महिलेने गावासाठी परिसरातील विधवा/निराधार महिलांसाठी केलेल्या उत्कृष्ठ कार्याबद्दल त्यांचा उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत वार्षिक सभेत जयश्री सरोदे, ग्रा.पं.कर्मचारी शरदवाडी यांचा विशेष पुरस्कार पुरस्कार सन्मान चिन्ह, शाल,प्रशस्तीपत्रक देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. मौजे शरदवाडी येथील जयश्री भिमाशंकर सरोदे यांचे पती भिमाशंकर सरोदे यांचे निधन झाल्यानंतर या महीलेने खचून न जाता ग्रा.पं.शरदवाडी येथे ग्रा.पं.लिपीक /शिपाई या पदावर काम करण्यास सुरुवात केली.

मौजे शरदवाडी ता.शिरूर येथे गायरान क्षेत्र ४० हेक्टर असून तेथे सर्व पदाधिकारी ग्रामस्थांनी या जागेचा उपयोग पर्यावरण संतूलन राखण्यासाठी गायरान जागा व रस्त्याच्या दुतर्फा मोठीवृक्ष लागवड केली.त्यानंतर वृक्षसंवर्धनासाठी श्रीमती सरोदे यांनी रोजगार हमी योजनेचा बिहार पॅटर्न राबवून सर्व वृक्ष माळरानावर हिरवेगार वृक्ष वाढविले. स्वतः विधवा असलेने जांबूत शरदवाडीतील विधवा व त्यांचे शालेय मुलांचा सर्व्हे करून विधवांचे मुलांना महाराष्ट्र शासनाचा महिला व बालकल्याण विभाग पुणे यांचेमार्फत २२०० रू.दरमहा शिष्यवृत्ती मिळवून दिली.सर्व विधवा निराधार /अपंग यांची संजय गांधी निराधार योजनेमधून त्यांना दरमहा १५०० रू. अनुदान सुरू करून दिले.महिलांसाठी मोफत आरोग्यशिबीर घेणे, शरदवाडी गावच्या महिलांसाठी विशेष योजना राबविलेबद्दल त्याची दखल उमेद -महाराष्ट्र राज्य ग्रामिण जिवन्नोती अभियान कार्यक्रमात घेवून त्यांना सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्या सुनितानाई गावडे यांचे हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.त्याच कार्यक्रमात ग्रामपंचायत पर्यावरण रक्षण व संवर्धनात त्यांचा मोठा सहभाग असल्याने ग्रामपंचायत शरदवाडी,सर्व पदाधिकारी यांच्यामार्फत त्यांचा सन्मान गुलाबाचे वृक्ष देवून करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सुनितानाई गावडे यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात सर्व उपस्थितांना श्रीमती जयश्री सरोदे यांनी पर्यावरण व महिलांसाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करून सर्व महिलांनी तसे कार्य आपापल्या गावात करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. शरदवाडीचे ग्रामसेवक पोपट शेलार ,सरपंच हरिभाऊ सरोदे व ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी यांचे अभिनंदन होत आहे.



# प्रेयसीच्या मुलाला रेल्वेत सोडून प्रियकराचे पलायन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रेयसीचा साडेचार वर्षांचा मुलगा प्रेमात अडथळा ठरत असल्यामुळे प्रियकराने मुलाला रेल्वेत सोडून सुटका मिळविण्याचा कट रचला. कटानुसार प्रेयसीच्या मुलाला रेल्वेत सोडून त्याने पळ काढला. मुलाच्या वडिलाने अपहरण केल्याचा बनाव केला. पोलिसांनीमुलाला वर्धा शहरातून सुखरुप ताब्यात घेतले. प्रियकराविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. ही घटना गणेशपेठ पोलीस ठाण्याअंतर्गत घडली. हंसराज दखने (२५) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो मुळचा गाव पोरा, लाखनीचा रहिवासी आहे. पीडित महिला ३० वर्षांची असून २०१९ मध्ये तिचे लग्न झाले. तिला साडेचार वर्षांचा एक मुलगा आहे. कौटुंबिक वाद असल्याने तिने पतीपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २०२३ पासून ती नागपुरात एकटीत राहते. मिळेल ते काम करून कामच्याच ठिकाणी राहत होती. त्याच परिसरातील दुसऱ्या हॉटेलमध्ये आरोपी हंसराज दखने हा कुकचे काम करतो. दोघेही हॉटेलमध्ये काम करीत असल्याने त्यांच्यात ओळख झाली होती.

# पीक कर्जवाटप प्रक्रियेची गती वाढवा

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या खरीप हंगामाला सुरवात झाली आहे. या हंगामावरच शेतकऱ्यांचा संपूर्ण आर्थिक डोलारा उभा राहतो. पेरणीच्या वेळेस बियाणे, खते घेण्यासाठी शेतकऱ्यांना आज पीक कर्जाची अत्यंत गरज आहे. त्यामुळे पीक कर्ज वाटपाच्या प्रक्रियेची गती वाढवून शेतकऱ्यांना वेळेवर पैसे उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शनिवारी दिले.

नियोजन सभागृह येथे कृषी व कृषी संलग्न विभागासोबत खरीप हंगामाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, रामपालसिंग व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पीक कर्ज वाटपात विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, शेतक-यांना वेळेवर कर्ज उपलब्ध होण्यासाठी बँकांनी विशेष शिबिर घेऊन कर्जवाटप करावे. कर्जवाटपासाठी बँकेत अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करावे. राष्ट्रीयकृत बँकांची कर्जवाटपाची गती अतिशय कमी आहे. यात सुधारणा करावी. 20 ते 22 ग्रामपंचायती संलग्न असलेल्या एखाद्या बँकेत केवळ 80 शेतक-यांना कर्ज वाटप होत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. व्यवस्थापक किंवा एखाद्या संबंधित व्यक्ती उपलब्ध नसला तर सदर कार्यभार दुस-या कर्मचा-यांकडे सोपवून पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया सोयीची करावी, असे निर्देश पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी बँकांना दिले. गतवर्षीपासून शासनाने 1 रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली आहे. यापूर्वी केवळ 50 ते 60 हजार शेतकरी या योजनेत सहभागी होत होते. मात्र गतवर्षी जिल्ह्यातील जवळपास 3 लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. ही चांगली बाब असल्याचेही मुनगंटीवार म्हणाले. यावेळी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी खरीप हंगाम 2024-25 चे नियोजन, बियाणे व खतांची उपलब्धता, गुणनियंत्रणाबाबत कार्यवाही, अनधिकृत कापूस बियाणे विक्रीविरुध्द कार्यवाही, प्रधानमंत्री पीक विमा योजना, 2023-24 मध्ये नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खरीप व रब्बी मध्ये पिकांचे झालेल नुकसान, नुकसानभरपाईचे अनुदान वाटप, पीक कर्ज वाटप, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रलंबित कृषी पंप जोडणी यासोबतच आत्मा अंतर्गत राबविण्यात येणारे विविध उपक्रमाचा आढावा घेतला.



**शेतकऱ्यांना कागदपत्रांसाठी अतिरिक्त भुर्दंड पडणार नाही याची काळजी घ्या :** गेल्यावर्षाप्रमाणे यंदाही प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकरी सहभागी होतील, यासाठी कृषी विभागाने नियोजन करावे . केवळ 1 रुपयात या योजनेत सहभागी होता येत असले तरी काही ठिकाणी कागदपत्रांसाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागतात, अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत . त्यामुळे कृषी व महसूल विभागाने याकडे गांभिर्याने लक्ष देऊन शेतक–यांना अतिरिक्त भुर्दंड पडणार नाही, याची काळजी घ्यावी, अशाही सूचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या .

सादरीकरणात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. तोटावार यांनी सांगितले की, सद्यस्थितीत जिल्ह्यात खरीपाचे हंगामाकरिता 777 कोटी रुपये पीक कर्ज वाटप करण्यात आले असून त्याची टक्केवारी 62.14 इतकी आहे.आतापर्यंत सर्वाधिक चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने 94 टक्के पीक कर्ज वाटप केले आहे . उर्वरित कर्ज जून अखेरीस वाटप करण्याबाबत सर्व बँकाना निर्देश पालकमंत्री महोदयांनी यांनी दिले आहे. पीक विमा योजनेअंतर्गत 91 कोटी 62 लाख निधी मंजूर झाला असून आतापर्यंत 25 कोटी 45 लाख पीक विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. आजच 17 कोटी रुपये पीक विमा पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहे. उर्वरित रक्कम जून अखेर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत ओरियंटल विमा कंपनीला निर्देश दिले आहे.

जिल्ह्यात एकूण लागवडीलायक क्षेत्र 5 लक्ष 52 हजार 729 हेक्टर असून सर्वसाधारण खरीपाचे क्षेत्र 4 लक्ष 58 हजार 857 हेक्टर (83.01 टक्के) आहे. जिल्ह्यात खरीप हंगाम 2024-25 मध्ये 1 लक्ष 91 हजार हेक्टरवर भाताची लागवड, 1 लक्ष 80 हजार हेक्टरवर कापूस तर 75 हजार हेक्टरवर सोयाबीनची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात या वर्षी आतापर्यंत 41 हजार 918 हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. जिल्ह्यात 20 जून 2024 पर्यंत 76 हजार 263 मे.टन बियाणे उपलब्ध झाले असून यापैकी 49 हजार 663 मे.टन बियाणांची विक्री झाली आहे. तर 88 हजार मे. टन खते जिल्ह्यात उपलब्ध आहे. बियाणे आणि खतांची कोणतीही कमतरता नसून पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे तोटावार यांनी सांगितले.

# चोखोबांचे मंदिर बांधले नाही हे वारकऱ्यांचे दुर्दैव

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** समकालीन सर्व संतांची भव्य मंदिरे बांधल्या गेली, मात्र संत चोखामेळा यांचे जन्मस्थळ आजही बकाल असून चोखोबांचे मंदिर बांधले गेले नाही ही बाब अखंड वारकऱ्यांसाठी दुर्दैव असल्याची खंत योगेशभाऊ जाधव फाउंडेशनच्या वतीने आयोजित संत संमेलनात विदर्भरत्न गोसेवक संजय महाराज पाचपोर यांनी व्यक्त केली. योगेशभाऊ जाधव फाउंडेशन च्या वतीने संत चोखामेळा यांच्या जन्मभूमीत संत संमेलन व वारकऱ्यांचा सन्मान सोहळाआयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात केंद्रीयमंत्री ना. प्रतापराव जाधव,महंत बालक गिरीजी महाराज मंठा,प्रसिद्ध रामायणाचार्य रामराव महाराज ढोक नागपूर,हभप प्रकाश महाराज जवंजाळ, गोसेवक संजय महाराज पाचपोर, प्रसिद्ध कीर्तनकार सुदाम महाराज पानेगावकर, हभप कांचनताई जगताप नाशिक, हभप अंजली ताई केंद्रे लातूर, पुरुषोत्तम महाराज पाटील,युवा कीर्तनकार संतोष महाराज वनवे बीड,आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे,माजी आमदार तुकाराम कायंदे,डॉ. शशिकांत खेडेकर, यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना पासपोर्ट महाराज यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना चोखामेळा जन्मस्थळ मेहुणा राजा येथे चोकोबांच्या भव्य मंदिराच्या उभारणीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करताना मंदिर आणि मंदिर परिसराचा विकास वारकऱ्यांच्या मनाप्रमाणे व्हावा असे आवाहन केले, त्यावर ना.प्रतापराव जाधव यांनी चोखामेळा जन्मस्थळाच्या विकासासाठी सकारात्मकतेने प्रयत्न करण्याचे वचन देताना संत समीरनाक मंत्री म्हणून नव्हे तर वारकरी म्हणून आलो.

येणाऱ्या काळात वारकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले.यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख दीपक बोरकर, ज्येष्ठ नेते धनशीराम शिंपणे,युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषी जाधव,जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुहिरे, तालुकाप्रमुख स्वप्निल शहाणे,अमोल काकड, राष्ट्रवादीचे कविष जिंतूरकर, सदाशिव मुंडे,एकनाथ काकड,यांच्यासह पंचक्रोशीतील वारकऱ्यांची उपस्थिती होती.याप्रसंगी विचार पिठावर उपस्थित सर्व संत महात्म्यांचे विठ्ठल रुक्माई ची मूर्ती व शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

# सकल ओबीसी समाजाचा जिंतूरात रास्ता रोको; पोलिसांचा मोठा बंदोबस्त

आधुनिक केसरी न्यूज

**बी. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** वडीगोद्री येथे प्रा.लक्ष्मण हाके यांनी पुकारलेल्या आमरण उपोषणास समर्थनार्थ म्हणून महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी रास्ता रोको करण्यात येत आहे. ओबीसी बांधव मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरत असून आज दि. २२ जून शनिवार रोजी शहरातील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात छत्रपती संभाजी नगर- नांदेड महामार्ग अडवण्यात आला. या बाबत सविस्तर माहिती असे की, वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी आमरण उपोषणास बसलेले प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून आज दि. २२ जून शनिवार रोजी शहरातीलमार्केट यार्ड येथून निघून छत्रपती शिवाजी महाराज मार्गे शहरातील अण्णाभाऊ साठे पुतळा जवळ सकाळी बारा वाजता पासून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान सदर ओबीसी आंदोलनास जिंतूर तालुक्यातील विविध खेड्यामधून सकल ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी प्रा. लक्ष्मण हाके नवनाथ वाघमारे यांचे मागील 11 दिवसांपासून उपोषण सुरू असून उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत असली तरी राज्य शासनाने या उपोषणाची कोणतीही दखल घेतलेली नाही. या उपोषणासाठी तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांनी पाठिंबा दर्शविला असून शासनाने लवकरात लवकर उपोषणाची दखल घ्यावी म्हणून शहरातील मार्केट यार्ड परिसरातून रॅली निघून वरुड नरसिंह चौक दादा श्री चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक बस स्थानक अण्णाभउ साठे पुतळापर्यंत मोर्चा काढून रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी लक्षिमण बुधवंत, नानासाहेब राऊत, प्रा. प्रभाकर वजीर, प्रमोद कराड, ड्रॉ. दराडे, सुरेश नागरे आदीनी मोर्चे करांना संबोधीत केले. पोलीस प्रशासनाच्या वतीने यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# सततच्या पाठपुराव्याने पुलकठड्यांची रंगरंगोटी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी करण्यात आलेल्या अनेक पुल काम कठड्यांतून मोजून तीन कठड्यांची रंगरंगोटी करण्यात आली असुण अनेक रंगरंगोटीच्या प्रतिक्षेत असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील बाजार सावंगी ते जैतखेडा हद्दपर्यंत आठदहा पुलकाम, झरी -बोडखा दरम्यान दोन पुल काम,बोडखा ते लोणी धामणी चिकलठाणा हद्द चार ते पाच पुलकाम, बोडखा लोणी ते गोळेगाव रसुलपूरा हद्द दहाबारा पुलकाम, बाजार सावंगी ते ताजनापूर चौफुली दोनतीन पुलकाम आदि ठिकठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत गुत्तेदार करवी ही सर्व पुलकामे करण्यात आली. यात पुलांच्या कामासह कठड्याची रंगरंगोटी पुला अंतर्गत मागेपुढे खडी सिमेंट किंवा डांबरीकरण सवानीकरण काम अंदाज पत्रकात तरतुद असते हे काम विभागाने ठेकेदारांकडून करून घेणे जवाबदारी आहे.परंतु असे न करता ठेकेदाराला लाभ म्हणून त्याकामाकडे दुर्लक्ष करण्यात येते जेंव्हा की पन्नास हजार ते एक लाख रुपये पर्यंत यास खर्च येतो.मग हे कामा कडे दुर्लक्ष का? यासंदर्भात वरिष्ठाधिकारी व स्थानिक तालुकास्तरी अधिकारी यांच्या सतत बातम्या द्वारे तोंडी तक्रार दाखल करुन अवगत करण्यात आले तेंव्हा ठिक आहे.म्हणून सर्कलमधील सात आठ पुल कठड्याची रंगरंगोटी करण्यात आली व अनेक पुलकठडे रंगरंगोटीच्या प्रतिक्षेत आहे. हे केव्हा होणार करणार असा सवाल नागरिक करत आहे हे विशेष.



# वेरुळ लेणी येथे पर्यटक व भक्तांची शनिवारी - रविवारी तोबा गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील जागप्रसिध्द वेरुळ लेणी येथे शनिवारी रविवारी सलग दोन दिवस सुट्टी आल्याने पर्यटक व भक्तांनी प्रचंड तौबा गर्दी केली होती तर अचानक आलेल्या पावसामुळे मात्र पर्यटक भाविकात मोठी तारांबळ उडाली. जागतिक ऐतिहासिक सुप्रसिद्ध वेरुळ लेणी येथे पर्यटकांची व भक्तांची नेहमी सतत गर्दी असतेच परंतु दि.२२व२३ शनिवारी रविवारी सलग दोन दिवस सुट्टी असल्याने तौबा गर्दी केली होती. वेरुळ लेणीसह बारा ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिर, म्हैसमाळ पर्यटन स्थळ, खुलताबाद भद्रा मारुती मंदिर,सुलीभंजन दत्त धाम मंदिर, औरंगाबाद मकबरा आदि व इतर पर्यटकांत आकर्षण असल्याने देश -विदेशातून पर्यटक भाविक भक्त येतात तर दोन दिवस सुट्टी असल्याने मात्र लेणी ते वेरुळ गाव ते खुलताबाद पर्यंत वाहने व पर्यटकांची प्रचंड गर्दी दिसून आली.तर त्यामुळे येथील सर्व व्यावसायीक धंद्यामुळे खुश



समाधानी दिसले.अचानक आलेल्या पावसामुळे तारांबळ उडाली मात्र मका गरम भुट्टा, गरम चहा, गरम भजे, वडा घेत पर्यटकांनी मौजमजा लुटली. तर ठिकठिकाणी पर्यटकांनी सेल्फी रिल्स बनवत मौज करताना दिसले त्यात पुरातन विभागाने माहिती फलक न लावल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.विभागाने लक्ष घालून लेण्या येथे सविस्तर मार्गदर्शन माहिती उपलब्ध करून द्यावी जेणेकरून पर्यटकांनी माहिती उपलब्ध होईल.

# बारुळ- मानारचे पाणी उदगीर-जळकोटला घेऊन जाणाऱ्या पाईपलाईन योजनेचे काम शिवसेनेने पाडले बंद

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** राष्ट्रीय महामार्ग विभागाची परवानगी न घेताच उदगीर व जळकोट तालुक्यातील १३८ गावांना पाणी नेणाऱ्या योजनेच्या कामाला दि.२२ जून रोज शनिवारी दुपारी शिवसेनेने पाईपलाईनचे काम बंद पाडले आहे. परवानगी घ्या नंतरच काम सुरू करा, अशी तंबी देऊन काम सुरू केल्यास शिवसेनेच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही यावेळी कंपनीच्या अभियंत्याला देण्यात आला. कंधार तालुक्यातील बारुळ मानार प्रकल्पातून उदगीर आणि जळकोट तालुक्यातील १३८ गावांना पाणी नेण्याचा घाट गेल्या वर्षी शासनाकडून घालण्यात आला. योजनेचे कामही सुरू झाले. पाईप रस्त्यांच्या दोन्ही बाजूस टाकण्यात आले. या योजनेला कंधार मधून मोठ्याप्रमाणात विरोध झाला. उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेनेही तालुक्यातील पाणी पळविण्याला विरोध करून काम बंद पाडले होते. विशेष म्हणजे आमदार आणि खासदारांनी याबाबत मौन पाळल्याने हे पाप नेमके कोणाचे? त्याबाबत शंकाही व्यक्त केल्या गेल्या होत्या.

लोकसभा निवडणूक लागल्याने योजनेचे काम बंद होते. निवडणूक संपताच कामाला सुरुवात करण्यात आली असल्याने दि.२२ रोजी शनिवारी दुपारी ३ वाजता यावेळी शिवसेनेचे (ऊबाठा) तालुका प्रमुख परमेश्वर जाधव, तालुका संघटक पंडित देवकांबळे, किसान सेना प्रमुख शिवाजी कदम व शिवसैनिकांनी हरबळ येथे सुरू असलेल्या कामावर प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित कंपनीच्या अभियंत्याला कामासंदर्भात जाब विचारला. राष्ट्रीय महामार्ग विभागाची परवानगी आहे का? अशी विचारणा केली.या कामाला परवानगीच नसल्याची बाब समोर आली. जाधव यांनी महामार्ग विभागाच्या शाखा अभियंत्याला भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून योजनेच्या कामाला मान्यता आहे काय अशी विचारणा करून पाईप लाईनचे काम सुरू असल्याची माहिती दिली. शाखा अभियंत्याने कामावर उपस्थित कंपनीच्या अभियंत्याला काम थांबविण्याचे आदेश दिले असल्याचे जाधव यांनी सांगितले.

तूर्तास पाईप लाईनचे काम थांबले असून परवानगी न घेताच काम सुरू केल्यास शिवसेनेकडून आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी सदरील कामास कायमची स्थगिती देऊन कंधार तालुक्यातील शेतकरी व जनतेवर होणारा अन्याय नाही थांबविल्यास शिवसेनेच्यावतीने जन आंदोलन उभे करणार असल्याचे तालुकाप्रमुख जाधव यांनी सांगितले.



**धरण उशाला अन् फायदा तिसऱ्याला** : लिंबोटी धरण, मानार धरण हे कंधारकरांच्या उशाला असताना तालुक्यातील जनतेला मुबलक पाणी मिळत नाही . कंधार शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा होत असून आणखी पावसाळ्यातही तालुक्यातील गावांमध्ये टॅंकर चालू आहेत . या धरणाचा फायदा दुसऱ्या तालुक्याला आणि जिल्ह्याला मिळत असल्याने कंधार– लोहा तालुक्यातील जनतेत संतापाची लाट पसरली आहे . एकीकडे विकासाच्या वल्गना करायच्या आणि दुसरीकडे आपल्या तालुक्यातून दुसऱ्या जिल्ह्यात पाणी जाऊ द्यायचे, हा कोणता विकास? असाही सवाल उपस्थित केला जात आहे .



# 350 वा राज्यभिषेक सोहळा; सारथीचे वनश्री अभियान संपन्न

## देवगिरी किल्ला परिसरात पीएचडी संशोधकांचे सीडबॉल पद्धतीने वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** छत्रपती शिवाजी महाराजांचा 350 वा राज्याभिषेक सोहळा सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शासन स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन केलेआहे. याच अनुषंगाने छत्रपती शाहू महाराज शिक्षण व प्रशिक्षण मानव विकास (सारथी) संस्थेने छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्याभिषेक अभियानांतर्गत चौदा ते सव्वीस जून या दरम्यान सारथीच्या आजी-माजी पीएचडी संशोधकांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गडकिल्ले परिसरात सिडबॉल पद्धतीने वृक्षारोपण करण्याचे ठरवले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून भोकरदन तालुक्यातील राजूर व परिसरातील पीएचडी संशोधकांनी देवगिरी किल्ला परिसरात सीडबॉल पद्धतीने हजारो बियांचे वृक्षारोपण केले. सारथी व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे तसेच सर्व उपव्यवस्थापकीय संचालकांच्या मार्गदर्शनानुसार छत्रपती संभाजीनगर, नाशिक,पुणे विभागातील संशोधकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. त्यासाठी चार पीएचडी संशोधकांचा एक गट तयार करण्यात आला होता. सीडबॉल फेकण्यासाठी देवगिरी किल्ला हे ठिकाण निश्चित करण्यात आले होते. यामध्ये गटप्रमुख बाळासाहेब बोराडे यांच्यासह भास्कर पडोळ, राजू मिसाळ, नरेंद्र शिंदे यांनी गटाचे प्रतिनिधित्व केले. शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवगिरी किल्ला परिसरात आंबा (131), चिंच (381), जांभूळ(274), सीताफळ(326), पळस (101) अशा एकूण 1213 झाडांच्या बियांचे सिडबॉल पद्धतीने वृक्षारोपण करून देवगिरीवर 350 वा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. या उपक्रमासाठी सारथी संचालक, उपसंचालक व पुरातत्त्व विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकजूट व्हावे : अभिजीत पोटे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख अभिजीत पोटे यांच्या नेतृत्वात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाचा ताबा घेऊन ठिय्या आणि मुक्काम आंदोलन दोन महिन्यापुर्वी केले होते त्यावर प्रादेशिक उपसंचालक यांनी संबंधित साखर कारखान्यांवर ऊस नियंत्रण कायदा १९६६ कलम ३ थकीत एफ आर पी कायद्या नुसार शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल व त्यावरील व्याज थकवणाऱ्या साखर कारखान्यांचे आरआरसी (जप्ती) प्रस्ताव साखर आयुक्तांना पाठवण्याचे लेखी पत्र दिले होते त्यावर कारवाई करत प्रादेशिक उपसंचालक साखर अहमदनगर शुभांगी गोड यांनी १८ जून रोजी पैसे थकवणारे ४ साखर कारखाने कुकडी सहकारी साखर कारखाना श्रीगोंदा , अगस्ती सहकारी साखर कारखाना अकोले, वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना पाथर्डी, गंगामाई साखर कारखाना शेवगाव या कारखान्यावर साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयास १८ जून रोजी ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील कलम ३ अन्वये म्हणजेच थकीत एफ आर पी कायद्यानुसार आर आर सी (जप्ती) कारवाई करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे ११ जून रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख अभिजीत पोटे यांनी पाठवलेल्या निवेदन पत्रानुसार पुढील कारवाईचा प्रस्ताव पाठवून पोटे यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठवण्यात आलेला आहे.

**शेतकऱ्यांना त्रास दिला तर सोडणार नाही** : RRC म्हणजे "जप्ती"



कारवाई ही तर सुरुवात आहे ऊस उत्पादक शेतकरी मित्रांनो एकत्रित या लढाई अजून संपली नाही ऊस नियंत्रण कायद्या नुसार (ऊस पंधरवाडा कायद्यानुसार) उशिरा होणाऱ्या ऊस बिलाचे १८ टक्के व्याज अजून बाकी आहे . आम्ही बोलत नाही करून दाखवतो .

**अभिजीत अशोकराव पोटे, जिल्हाप्रमुख प्रहार जनशक्ती पक्ष अहमदनगर**





गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टॅंड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# शिवराज्याभिषेक दिनी विद्यापीठात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सारथी विद्यार्थी कृती समिती छत्रपती संभाजीनगर विद्यार्यांचा सिड बॉल व वृक्षारोपण उपक्रम विद्यापीठ परीसरात करण्यात आला. त्यात नेतृत्व डॉ.राम गंगाधर वजिरे सर यांनी सहकाऱ्यांना घेऊन सीड बॉल प्रोग्राम अवलंबला आणि त्यांचे सहकारी संशोधक विद्यार्थी अप्पासाहेब अशोकराव चव्हाण, राहुल श्रीकृष्ण इंगळे,ओमप्रकाश भगवानराव साबळे, सीमा गुलाबराव कदम, योगेश बाबासाहेब कवडे, रेश्मा लाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेक निमित्त आदरांजली वाहण्यासाठी वृक्ष रोपण करून त्याचबरोबर सलग पाच वर्ष शिवरायांना त्यांच्या राज्याभिषेक निमित्त आदरांजली वाहण्यासाठी संकल्प करून वर्षानुवर्ष वृषणुरोपण करुत अशी स्वतःशीच मनोमन प्रार्थना केली. सर्वप्रथम राष्ट्र, नंतर गुरु, मग पालक, मग देव, सर्वप्रथम स्वतःकडे नाही तर राष्ट्राकडे पाहा.

# एसबीईएस सेंटनरी स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भवन शिक्षण संस्था संचलित, एसबीईएस सेंटनरी स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य राहुल मोहनपुरकरसर, शाळेच्या समन्वयक श्रीमती प्रज्ञा देशपांडेमॅडम आणि श्रीमती राखी गुप्तामॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नर्सरी ते इयत्ता दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी योगासनाची विविध प्रात्यक्षिके सादर केली.या प्रात्यक्षिकांमध्ये प्रामुख्याने मन, बुद्धी आणि शरीर यांचा विकास होईल याचा विचार करण्यात आला होता. योगासनांच्या प्रकारात 1 प्राणायाम. 2 सूर्यनमस्कार. 3 वृक्षासन 4 अर्ध चक्रासन 5 पश्चिमोत्तानासन 6 वक्रासन 7 भुजंगासन 8 शलभासन 9 अर्धहलासन 10 शवासन यांचा समावेश करण्यात आला होता. विशेष म्हणजे शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने योग कृतींचे प्रात्यक्षिक दाखवले. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री राहुल मोहनपुरकर यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देताना," 2024 हे वर्ष खास महिला सशक्तीकरणासाठी आहे याचा आवर्जून उल्लेख केला.. विद्यार्थ्यांनी योगशिक्षणातील कौशल्यांची माहिती घरी सुद्धा सांगितली पाहिजे. तसेच योग शिक्षणाचे महत्त्व कुटुंबात पोहोचवण्याचे महत्त्वाचे माध्यम विद्यार्थी आहेत त्यांनी हे महत्त्व जाणून घ्यावे व याचा अभ्यास आपल्या घरी ही करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. संपूर्ण विश्वभरात 177 देश योग दिन साजरा करतात. आपणही त्याचे समर्थ भाग बनले पाहिजे योग ही महान आंतरराष्ट्रीय संकल्पना आहे. त्याचे महत्त्व आपण जनमानसात ठसवले पाहिजे. यासंदर्भाने मार्गदर्शन केले. प्रशालेतील क्रीडा शिक्षक श्री सुभाष देशमुख आणि श्रीमती शीतल गोपीशेट्टी यांनी योग दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. प्रशालेच्या शिक्षिका श्रीमती सारिका मॅडम यांनी योग दिनाचे देखावे विद्यार्थ्यांच्या मदतीने सादर केले. प्रशालेत सादर झालेल्या विविध योगासनांची प्रस्तावना, उपयुक्तता याबद्दल शाळेच्या क्रीडाशिक्षिकांनी माहिती दिली व विविध योगासनांचे प्रकार विद्यार्थ्यांकडून करवून घेतले. प्रस्तुत कार्यक्रमाचे श्रीमती ऋतूजा जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. योग दिनाच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेचे विद्यार्थी, शालेय कर्मचारी, शाळेतील शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.





# टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा डांबरीकरण; नागरिकांत समाधान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटाम खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम रखडल्याने वाहनधारक नागरिकांचे हाल सुरू होते. ठेकेदार तथा विभाग मात्र अनियमितता चालढकल करीत असल्याने नागरिकांतून रोष व्यक्त करण्यात येत होता. माध्यमांनी सतत पाठपुरावा करून ही विभागाला अवगत केले होते. आता कोठे हे काम मार्गी लागले आहे. नागरिकांनी समाधान व्यक्त करुन माध्यमांचे कौतुक केले आहे. टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा पर्यंत रस्त्यांचे कित्तेक वर्षांपासून खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम साठी नागरिक मागणी करुन होते मात्र विभाग या ना त्या कारणे पुढे करत कामात चालढकल करत होता.तर काम सुरू होवून ही कामात सतत चालढकल अनियमितता दिसून आली यामुळे वाहनधारक नागरिक प्रचंड नाराज तथा रोष धरुन होते.यासंदर्भात दैनिकांने सतत पाठपुरावा केला. विभाग मात्र हो.. हो.. म्हणत चालढकल करून होता. मात्र नागरिक आता रस्ता रोको आंदोलन करण्याच्या मनस्थितीत होते. त्यापुर्वीच विभागाने मात्र तातडीने टाकळी राजेराय ते काटशेवरी फाटा रस्ता डांबरीकरण मजबुतीकरण काम करत सिलकोट ही करत असल्याने रस्ता गुळगुळीत झाल्यानें वाहनांचा वेग वाढला असुण अतिशय टाकळी गाव वा काटशेवरी फाटा गाठता येत असल्याचे नागरिकांनी प्रतिनिधीस सांगितले.

# प्रा. हाक्के यांच्या आरक्षण बचाव उपोषणाला मुखेडातील ओबीसी बांधवांचा पाठींबा

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** प्रा. लक्ष्मण हाक्के यांचे जालना जिल्यातील वडीगोद्री येथे चालू असलेल्या ओबीसी आरक्षण बचाव उपोषणाला मुखेडातील ओबीसी बांधवांनी तहसिलदार यांना दि. 21 रोजी निवेदन देऊन जाहीर पाठींबा दिला आहे. प्रा.हाक्के यांनी मागील 8 दिवसापासुन उपोषण सुरु करुनही सरकारने या उपोषनाची दखल घेतली नाही. या उपोषनाची दखल घ्यवी. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का देऊ नये. ओबीसी प्रवर्गात 374 जाती असुन आजही यांचा व्यवसाय मेंढया चरणे,रानात भटकंती,डिंक मोह तेंदुचे पाने जमा करणे, भिक्षा मागणे, मिळेल ते काम करुन आपला व आपल्या कुटुंबाचा उदनिर्वाह करत असतात. पण सध्या भरमसाठ संख्या असलेला समाज ओबीसी मध्ये शिरकाव करु पाहत आहे. यामुळे ओबीसी बांधवाचे आताचे व पुढच्या पिढीचे जीवन अंधकारमय होईल. संघर्षवीर प्रा. लक्ष्मण हाक्के यांचे मागील 8 दिवसापासुन उपोषण सुरु आहे. या उपोषणाची दखल घेऊन ओबीसी समाजाला न्याय दयावा अन्यथा ओबीसी बांधव रस्त्यावर उतरतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी विश्वनाथ कोलमकर, ॲड. शिवराज पाटील कुंद्राळकर, मारोती दिनकर, टि.व्हि. सोनटक्के, माजी नगरसेवक चंद्रकांत गरुडकर, माजी नगरसेवक प्रा.विनोद आडेपवार, माजी नगरसेवक गोविंद घोगरे, माजी नगरसेवक नासेर पठाण, माजी नगरसेवक मैनोदीन शेख, ॲड. सुनिल पौळकर, ज्ञानेश्वर डोईजड, विनोद दंडलवाड, शिवा बेळीकर, बलभिम शेंडगे, संगमेर देवकत्ते, करण रोडगे, सचिन श्रीरामे, एम.आर. गोपनर, गजानन साखरे, बालाजी गवते, ज्ञानेश्वर बोमनाळे, सुधीर रॅपनवाड, अमोल घोगरे, विकास हेळगिरे,रामा विभुते,शिवाजी चव्हाण, संभाजी मुकनर, रमेश चौडेकर, अनिल चव्हाण,गुपित कांबळे, बबन नाईक,सदाशिव देपकत्ते, नितिन वाडीकर, मारोती सादगीर, विकास मुंडकर,रामराव चव्हाण, रफिक शेख, संजय केंद्रे, बजरंग रणभिडकर, ज्ञानोबा वडेर, हाणमंत हाक्के यांच्यासह शेकडो ओबीसी बांधव उपस्थित होते.






# हार-फुलांना आमचा कधीच विरोध नव्हता

## माजी खासदार डॉ. सुजय विखे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** काही झाले तरी विखे मुळे झाले असा प्रचार करून गैरसमज केला जातो कोव्हीड काळात साईभक्त व ग्रामस्थांच्या हितासाठी हार फुले बद करण्यात आली होती ती सुरू करावी यासाठी न्यायालयात जनहित याचिका दाखल करणारे शेतकरी देखील आमचे होते लवकरच न्यायालयाचा सकारात्मक निर्णय लागेल अशी अपेक्षा व्यक्त करुन शेतकरी फुल उत्पादक व शिर्डी कराचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण वचन बध्द असल्याचे सांगून कोणतेही काम असले तरी मोबाईल वर मेसेज टाकले तरी ती मार्गी लागेल असे सांगत हार फुलांना आमचा कधीही विरोध नव्हता असे मत खा. डॉ. सुजय विखे यांनी शिर्डी येथे बेरोजगार तरुणाच्या मेळाव्यात सागितले.
या प्रसंगी माजी नगराध्यक्ष कैलास बापु कोते अभय शेळके सजय गव्हाणे बाबासाहेब कोते निलेश कोते राष्ट्रवादीचे राहता तालुक्यातील अध्यक्ष संदिप सोनवणे सुजित गोदकर मगेश त्रिभुवन फकिरा लोढा आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते.

खा डॉ सुजय विखे पाटील म्हणाले की भाविकांना माफक दरात फुले हार उपलब्ध झाले पाहिजे आर्थिक शोषण होता कामा नये नेहमीच सर्व सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी विखे परिवाराने प्रयत्न केला आहे म्हणून सलग ३५वर्ष ना राधाकृष्ण विखे पाटील लोकप्रतिनिधी आहे हा साईबाबाचा व जनता जनार्दनाचा आशिर्वाद आहे हे विरोधक देखील मान्य करतात न्यायालयाचा सकारात्मक निर्णय येईल अशी अपेक्षा व्यक्त केली शिर्डी शहरात अवैध व्यावसायिकांना कधीच पाठबळ दिले नाही १५दिवसात गुन्हेगारी व अवैध दारू व्यवसाय रोखण्यासाठी प्रयत्न करुण त्याचे सकारात्मक परिणाम जनतेला दिसतील असा विश्वास व्यक्त करुन मी आता मोकळा आहे माझ्याकडे वेळ आहे. त्यामुळे जनतेने त्याच्या अडचणी सांगितल्या नतर त्या सोडवण्यासाठी आपण प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर